रोज वाचा Digital Bahujan Saurabh https://bahujansaurabh.com

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रोज वाचा Digital Bahujan Saurabh https://bahujansaurabh.com

बुधवार, ६ सप्टेंबर २०२३ | वर्ष : ३ | अंक : २४९ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Wednesday, 6 September 2023 | Year : 3 | Issue : 249 | Daily | Rate: Rs. 5/-


# मनोज जरांगे पाटील उपोषणावर ठाम !

## सरकारला दिला चार दिवसांचा वेळ

**जालना :** राज्य सरकारमधील 3 मंत्री आणि माजी 2 मंत्री मनोज जरांगे पाटील यांची मनधरणी करत होते. पण अखेरपर्यंत जरांगे पाटील यांनी नमती भूमिका न घेता मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे, त्यासंबंधीचा जीआर आणा-मगच मी माझं उपोषण मागे घेतो, अशी भूमिका लावून धरली. त्यामुळे राज्य सरकारच्या शिष्टमंडळाला रिकाम्या हाती परतावे लागले. आंदोलन मागे घेणार नाही, पण सरकारला चार दिवसांचा वेळ देत असल्याचे शिष्टमंडळाच्या चर्चेनंतर मनोज जरांगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणावर अध्यादेश काढण्यासाठी आपण सरकारला चार दिवसांची मुदत देत आहोत. मी कोणत्याही परिस्थितीत माझ्या मराठा समाजाला फसवू शकत नाही. अनेक चांगल्या घरांमधील मराठा समाजाची मुले आत्महत्या करतायेत. अनेक सरकारी भरती तोंडावर आहेत. मराठ्यांच्या पोरांचे कल्याण होऊ द्यात. तुम्ही देवदूत व्हा, आरक्षण दिले तर मराठवाड्यातील हा मराठा समाज तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचेल, पण तोपर्यंत माझं उपोषण मी मागे घेणार नाही, मला मुंबईला येण्याचा आग्रह धरू नका, असं जरांगे पाटलांनी सरकारी शिष्टमंडळाला निक्षून सांगितले. मराठवाड्यातील मराठ्यांना



कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जालनाच्या अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या आंदोलकांचं उपोषण सुरू आहे. आंदोलनाचा आठ आठवा दिवस आहे. जरांगे यांनी उपोषण मागे घ्यावे, यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. आज सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाचे शिष्टमंडळ जरांगे पाटलांच्या भेटीसाठी आलं. यात स्वत: गिरीश महाजन, अतुल सावे आणि संदीपान भुमरे होते. शिष्टमंडळाने सुमारे तासभर जरांगे पाटलांशी चर्चा केली. परंतु शासनाच्या अध्यादेशाशिवाय मी मागे हटणार नाही, अशी भूमिका शेवटपर्यंत जरांगे यांनी घेतली. एखाद्या आंदोलनात सरकार कशी शिष्टाई करते, हे आज सगळ्यांनाच पाहायला मिळाले. कारण सरकारची मनधरणी आणि आंदोलकांची भूमिका माध्यमांनी आज थेट लाईव्ह दाखवली.

मराठवाड्याच्या मराठा समाजाला ओबीसींच्या सगळ्या सवलती लागू केल्या आहेत. तुमच्या मागणीप्रमाणे शासनाला निर्णय घ्यायला आणखी एक महिन्यांचा कालावधी द्या. सरकार आरक्षणासाठी सकारात्मक आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी कालही पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांची भूमिका राज्यातील जनतेला सांगितली आहे. तेव्हा आपण एक पाऊल मागे या आणि सरकारला एक महिना वेळ द्या, अशी विनंती महाजन यांनी केली. परंतु जरांगे पाटील यांनी त्यांची विनंती फेटाळून लावली. मागील महिन्यात सरकारने वेळ मागितली होती. तेव्हा चार दिवसांच्या ऐवजी आठवडाभर वेळ दिला. पण सरकारने निर्णय घेतला नाही. आता मी तुम्हाला एक महिन्याचा वेळ देऊ शकत नाही. कारण शेवटी हा आमच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. समाजाचा रोष मी माझ्या अंगावर घेऊ शकत नाही. घरी कुटुंबाला सांगितले, आलो तर तुमचा नाही तर समाजाचा होईन... निघाली तर आरक्षणाची जल्लोषयात्रा निघेल नाहीतर माझी प्रेतयात्रा पण आता माघार नाही, असा आक्रमक पवित्रा जरांगे पाटलांनी शिष्टमंडळासमोर बोलून दाखवला. जरांगे पाटलांचा आक्रमक बाणा पाहून शिष्टमंडळाला हताशपणे परतावे लागले.

एक महिन्याच्या आत आरक्षणाबाबतचा अहवाल अधिकारी देणार आहे. त्यामुळे एक महिन्यात हा प्रश्न मार्गी लागणार असून, तेवढा वेळ देण्यात यावा. न्यायालयात टिकणार आरक्षण सरकाराला द्यायचं आहे. काल काही माजी न्यायाधीश यांच्यासोबत चर्चा झाली असल्याचे राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

गिरीष महाजन चर्चा करत असतानाच काही कार्यकर्त्यांनी अचानक घोषणाबाजी देण्यास सुरुवात केली. मात्र यावेळी मनोज जरांगेंनी यांनी कार्यकर्त्यांना थांबवले. संपूर्ण आयुष्य आपले घोषणाबाजी करण्यात गेले आहे. त्यामुळे आता आपल्याला आरक्षण हवे आहे. फक्त घोषणाबाजी करून काय करणार. सराकरचे शिष्टमंडळ आले असून, त्यांच्यासोबत चर्चा करू असे म्हणत त्यांनी घोषणाबाजी थांबवली.

## आरक्षण द्यायला कोर्टाचा विरोध नाही : ॲड. प्रकाश आंबेडकर

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी अंतरवली येथे मराठा आंदोलकांची भेट घेतली. प्रकाश आंबेडकर यांनी आंदोलक मनोज जरांगे यांच्यासोबत जवळपास अर्धा तास चर्चा केली. आंबेडकर यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी महत्वाचा सल्लादेखील दिला.



आरक्षणाच्या यादीत मराठा समाजाचा उल्लेख बाबासाहेब आंबेडकर यांनी केला होता. शिक्षण मराठा समाजापर्यंत पोहचवायचं असेल तर मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, अशी भूमिका त्यावेळी होती. प्रकाश आंबेडकर म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांना विनंती आहे की, त्यांनी हा लढा सुरु ठेवण्यासाठी आपल्या प्रकृतीकडे लक्ष दिलं पाहिजे. हा लढा एक दिवसाचा नसतो, हे आपण महात्मा गांधींपासून पाहत आलो आहे. स्वातंत्र्याचा लढाही अनेक दिवस चालला. ब्रिटनमध्ये जोपर्यंत चर्चिल सत्तेत राहतील तोपर्यंत भारताला स्वातंत्र मिळणार नाही, असं इंग्लंडमध्ये सांगितलं जात होते. त्यानंतर चर्चिल हरले, आणि सत्तेत ॲटली आले. सत्तेत आल्यानंतर ॲटलींनी सांगितले, आम्ही भारताला स्वातंत्र देऊ आणि भारताला स्वातंत्र मिळाले. आपल्यालाही अशीच वाटचाल करावी लागेल. येथील व्यवस्थेला आणि न्यायालयालाही तुम्ही अंगावर घ्यायला, तुम्ही शिकले पाहिजे. ज्या दिवशी तुम्ही येथील व्यवस्थेला आणि न्यायालयाला अंगावर घ्याल, त्यादिवशी तुम्ही ज्या प्रश्नासाठी लढत आहात, तो प्रश्न मार्गी लागायला वेळ लागणार नाही, हे आपण सर्वांनी लक्षात घ्यायला हवं, असंही प्रकाश आंबेडकर म्हणाले. राज्यघटनेमध्ये असं कुठेही नमूद केले नाही की, अमूक समाजाला आरक्षण देता येणार नाही. कोर्टाने सुद्धा म्हटलं आहे की, एखाद्या समाजाला आम्ही आरक्षण देणार नाही, असे म्हटले नाही. पण आरक्षण देताना संबंधित वर्गाला खरंच आरक्षणाची गरज आहे का? हे सरकारने सिद्ध करावं. शासनाने तसे सिद्ध केले, तर त्यांना आरक्षण देण्यात आमचा कुठेही हस्तक्षेप नसेल, असेही प्रकाश आंबेडकरांनी नमूद केले. यशवंतराव चव्हाण विचारवंत होते त्यांनी ईबीएस संकल्पना काढली होती. इतर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा आर्थिक दुष्टीकोणातून मिळेल. माणूस जसा श्रीमंत होतो तसा तो गरीबांकडे लक्ष देत नाही, हीच परिस्थीती समाजातदेखील आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

## फडणवीसांनीच लाठीहल्ल्याचे आदेश दिले : नाना पटोले

**चंद्रपूर :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत 'इंडिया'ची बैठक सुरू असताना मराठ्यांना उपोषणाला बसण्यास सांगितले तर उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलकर्त्यांवर लाठी हल्ला करण्याचे आदेश दिले.



कुठे ना कुठे राज्य सरकार व फडणवीस यांच्याकडून पाप झाले आहे, त्यामुळेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागितली आहे. सरकार चुकले म्हणून गुन्हे वापस घेतले आहेत. पाप झाकण्यासाठी सरकारने ही कृती केली आहे. राज्यातील सरकार जल्लाद असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले.

जनसंवाद यात्रेनिमित्त चंद्रपुरात प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी पत्रपरिषदेत भाजप व मोदी सरकार तथा राज्यातील सरकारवर गंभीर आरोप केले. पत्रपरिषद मध्ये पटोले यांनी मोदी सरकार च्या काळात देशाची अवस्था वाईट झाली आहे, राज्यात व केंद्रात लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार हुकूमशाही पद्धतीने वागत आहे. आमचे दुःख मांडायला चौथा स्तंभ देखील समोर येत नाही ही व्यथा जनसंवाद यात्रेत लोक मांडत आहेत.

## कलम 370 वर सुनावणी पूर्ण

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीर राज्याला विशेष राज्याचा दर्जा देणारं कलम 370 रद्द केल्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सुप्रीम कोर्टात सुनावणी पूर्ण झाली आहे. यावरचा निकाल खंडपीठानं राखून ठेवला आहे. त्यामुळं आता हे कलम 370 रद्दचं होणार की पुन्हा बहाल होणार? याकडं सर्वांच्या नजरा लागून आहेत. सन 2019 मध्ये मोदी सरकारने कलम 370 संसदेत मंजूर करुन घेत रद्दबातल केले होते. त्यानंतर कलम 35अ देखील रद्द झाले होते. त्यानंतर केंद्र सरकारनं या राज्याचे दोन तुकडे करत दोन्हींना केंद्रशासित प्रदेश म्हणून नोटिफाय केले. त्यानुसार जम्मू आणि काश्मीर हा एक भाग विधानसभा असलेला केंद्र शासित प्रदेश तर लडाख हा संपूर्ण केंद्रशासित प्रदेश बनला. सरकारच्या या निर्णयाचं अनेकांनी स्वागत केलं होतं, पण



मूळच्या काश्मिरी असलेल्या नॅशनल कॉन्फरन्स, पिपल्स डेमोक्रेटिक पार्टीने याला विरोध केला होता.

दरम्यान, हे कलम रद्द झाल्यानंतर याविरोधात ते पुन्हा प्रस्थापित करण्यात यावं यांसह विविध मुद्द्यांवरील अनेक याचिका सुप्रीम कोर्टात दाखल झाल्या होत्या. या सर्व याचिकांवर एकत्रितपणे गेल्या 16 दिवसांपासून सलग सुनावणी झाली, ती आज पूर्ण झाली आणि कोर्टाने यावरचा निर्णय राखून ठेवला.

## आयाबहिणींवर लाठीहल्ला करणाऱ्यांच्या हातात सत्ता ठेवणार नाही : शरद पवार

**जळगाव :** जालना येथील उपोषण करणाऱ्या लोकांवर लाठीहल्ला करण्यात आला. पुरुष, महिला, लहान मुले जखमी झाले. शेतकरी, शेतमजूर अनेकांवर लाठीहल्ला करण्यात आला. राजकारण्यांकडून सत्तेचा गैरवापर करण्यात आला. आयाबहिणींवर लाठीहल्ला करण्याची ज्यांची नीती असेल त्यांच्या हातात सत्ता ठेवणार नाही, या सगळ्यांचा आपण शंभर टक्के पराभव करू, या लढाईसाठी आपण सगळ्यांनी तयार राहिले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी केले.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची आज जळगाव शहरात जाहीर सभा पार पडली. या सभेच्या प्रसंगी शरद पवार बोलत होते. यावेळी त्यांनी सध्याच्या परिस्थितीला सरकारला जबाबदार धरत जोरदार निशाणा साधला. सध्या सर्वत्र दुष्काळाची स्थिती असून जळगाव जिल्हादेखील या दुष्काळाच्या छायेत आहे. सध्या राज्यभरात महागाई, बेरोजगारी असे असंख्य प्रश्न असून शेतकऱ्यासमोर अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत, ही स्थिती बदलायची आहे. ही स्थिती एकदम बदलू शकत नाही. राज्यकर्ते जर आपल्या हातातील सत्तेचा योग्य वापर करतील तर ही स्थिती बदलू शकते. आज राज्य आणि केंद्राची सत्ता ज्या भाजपच्या हातामध्ये आहे, त्यांना शेतकऱ्यांच्या दुःखाबद्दल काहीच वाटत नाही. दुष्काळग्रस्तांबद्दल काहीच वाटत नाही, प्यायला पाणी नाही, त्याची चिंता वाटत नाही. टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आज राज्यावर आली आहे, हे सारं का आहे. तर चुकीच्या लोकांच्या हातात राज्य गेल्यामुळे हे झालं आहे, असा घणाघात शरद पवार यांनी केला.



शरद पवार पुढे म्हणाले की, यवतमाळ जिल्ह्यात गेल्या आठवड्यात तब्बल 18 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबू शकत नाहीत? शेतकरी आत्महत्या का करत आहे, याचा तपास राज्य सरकारने करणं महत्त्वाचे आहे 1984-85 मध्ये जळगाव ते नागपूर दिंडी काढण्यात आली. पहिल्या दिवशी हजार लोक होते. दुसऱ्या दिवशी 25,000 लोक झाले. तिसऱ्या दिवशी 50 हजार लोक जमा झाले. त्यामुळे शेतकरी, सामान्य नागरिक यांचे राजकारणात महत्वाचे स्थान असते.

## तर पंकजा मुंडेंबरोबर युती करू : बच्चू कडू

**नाशिक :** प्रहारचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चू कडू यांनी भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांच्याबाबत मोठे विधान केले आहे. पंकजा मुंडे यांच्यात मोठी क्षमता आहे. त्यांच्याकडे ताकदही आहे. त्यांचे स्वतःचे दहा-पंधरा आमदार असतील, तर आम्ही त्यांच्याबरोबर युती करू, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.




बच्चू कडू म्हणाले, पंकजा मुंडे यांच्यामध्ये क्षमता आहे, यात मला शंका आहे. आमच्यात सुद्धा क्षमता आहे. आम्ही मेहनत करतो. आम्ही गावा गावात जातो, जिल्ह्यात जातो, माझ्यावर साडेतीनशे गुन्हे दाखल आहेत. आमच्यात क्षमता नसताना, आमचा बापदादा राजकारणात नसतानासुद्धा कामातून सेवेतून उभे केलेले वलय आहे. आम्ही कुणाला जातीबद्दल सांगितले नाही. सेवा हा आमचा पहिला धर्म आहे. सेवेशिवाय आम्हाला काही समजत नाही. पंकजा मुंडे यांच्यात क्षमता आहे. त्यांनी तपासली पाहिजे. स्वतःचे दहा-पंधरा आमदार असतील, तर हरकत नाही. आम्हीही त्यांच्याबरोबर युती करू, असे बच्चू कडू यांनी सांगितले.

## प्रेसिडेंट ऑफ इंडिया ऐवजी भारत लिहिल्याने नवा वाद

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय मंचावर इंडिया ऐवजी भारत हे नाव वापरण्यास केंद्र सरकारनं सुरूवात केली आहे, असंच म्हटले पाहिजे. कारण राष्ट्रपती भवनाकडून प्रेसिडेंट ऑफ इंडिया ऐवजी प्रेसिडेंट ऑफ भारत असा उल्लेख करण्यात आला आहे. जी 20 बैठकीसाठी दिलेल्या आमंत्रणात प्रेसिडेंट ऑफ भारत असा उल्लेख आहे. त्यामुळे भारत हे नाव जी- 20 च्या निमंत्रण पत्रिकेवर लिहिण्यास गैर काहीच नाही. तरीही, कदाचित अचानक बदल केल्याने काही विरोधक यावर टीका करत आहेत. यामुळेच, विशेष अधिवेशनात नेमकं काय होणार याच्याबद्दल तर्कवितर्क सुरू असताना त्यातली एक शक्यता या नामबदलाची पण आहे का याबद्दल राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

ममता बॅनर्जी म्हणाल्या, देशात अचनाक असे काय घडले की आता इंडियाऐवजी भारत वापरायचे आहे. लहानपणापासून आपल्याला इंडिया म्हणजे भारत हे माहिती आहे. विरोधी पक्षाच्या आघाडीने इंडिया हे नाव बदलून


On the occasion of G20 Summit
The President of Bharat
requests the pleasure of the company of
at Dinner
on Saturday, September 09, 2023 at 2000 hrs
Multifunction Hall, Le... Bharat Mand...
...col Section ...try of External Affairs
President Of Bharat

जर भारत केले तर भाजप भारत नावाऐवजी दुसरे नाव वापरणार का? असा सवाल अरविंद केजरीवाल यांनी उपस्थित केला आहे. इंडिया नाव काढण्याबाबत आम्हाला माहिती नाही, मात्र इंडिया हे नाव हटविण्याचा कोणाला अधिकार नाही. तसेच हे नाव कोणीही हटवू शकत नाही, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी दिली आहे.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

**वर्धा :** जिल्ह्यातून मोठी बातमी समोर येत आहे. शेतात बैल चारत असलेल्या शेतकऱ्यावर दबा धरून बसलेल्या वाघानं हल्ला केला. या दुर्दैवी घटनेत शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. ही घटना समुद्रपूर तालुक्यातील मंगरूळ वनपरिक्षेत्रात घडली आहे. गोविंदा लहानु चौधरी असे या शेतकऱ्याचं नाव आहे. ते समुद्रपूर तालुक्यातील ताडगाव येथील रहिवासी होते.

गोविंदा चौधरी हे आज सकाळी समुद्रपूर तालुक्यातील मंगरूळ वनपरिक्षेत्रात बैलांना चारण्यासाठी घेऊन गेले होते. याचदरम्यान या ठिकाणी दबा धरून बसलेल्या वाघानं त्यांच्यावर हल्ला केला. वाघानं त्यांना दोनशे मिटर फरफटत नेले. या घटनेत त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळं हळहळ व्यक्त होतं आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांसह वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.


## वाचकांना आवाहन

दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.

दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. ही वाचकांनी नोंद घ्यावी.

बहुजन सौरभ

मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ


## बैलजोडी चोरीचा संशय, मारहाणीत वृद्धाचा मृत्यू

**अकोला :** सांगवी मोहाडी येथे बैलजोडी चोरीला गेल्याच्या संशयावरून चार ते पाच जणांनी एका 60 वर्षीय वृद्धास मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृत्यूचे कारण उत्तरीय तपासणी अहवालातून स्पष्ट झाले. या प्रकरणात अकोट फैल पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. सांगवी मोहाडी येथे एक बैलजोडी चोरीला गेली. त्याच्या संशयातून देवेंद्र दरेकर (60) यांना गावातील दिनकर वाघ, बाळा तेलगोटे, संतोष जंजाळ, जनार्दन त्यंबके सर्व रा. सांगवी मोहाडी यांनी मारहाण केली. यामध्ये गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर उपचार करून मुलाने घरी आणले होते. दरम्यान, रविवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. उत्तरीय तपासणी करण्यात आली. यामध्ये आरोपींनी छाती व पोटावर मारहाण केल्यामुळे वृद्धाचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर अकोट फैल पोलिसांनी भादंवि कलम 302 नुसार गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## शिक्षकाने केला जिल्हा परिषद शाळेचा कायापालट!

**नागपूर :** एखाद्या शिक्षकाने मनावर घेतले तर, तो शाळेत किती 'सकारात्मक' बदल घडवून आणू शकतो, याचे आदर्श उदाहरण खुर्सापार (ता. सावनेर) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हणता येईल. केवळ दोन महिन्यांपूर्वी आलेल्या मुख्याध्यापकाने अल्पावधीतच शाळेचे रंगरूप पालटून विद्यार्थ्यांना 'हेल्दी' वातावरण उपलब्ध करून दिले. प्रामाणिक प्रयत्नातून शाळेचा कायापालट केल्याबद्दल या शिक्षकाची गावात वाहवा होत आहे.

आजच्या घडीला ग्रामीण भागांतील बहुतांश झेड. पी. शाळांची अवस्था वाईट आहे. कित्येक शाळा तर शेवटच्या घटका मोजत आहेत. अशा परिस्थितीत एखादी शाळा चांगल्या गोष्टींसाठी चर्चेचा विषय ठरत असेल तर ते निश्चितच कौतुकास पात्र आहे. 67 वर्षे जुन्या दोन हजार लोकसंख्येच्या खुर्सापार येथील झेड. पी. शाळेला आदर्श बनविणारे हे





मुख्याध्यापक आहेत प्रदीप पडवल. 17 वर्षे रत्नागिरी येथे इमानेइतबारे नोकरी केल्यानंतर दोन महिन्यांपूर्वीच (30 जूनला) ते बदली होऊन खुर्सापार येथे आले होते.

एक ते चार वर्ग, 30 विद्यार्थी आणि मुख्याध्यापकांसह दोन शिक्षक असलेल्या या शाळेची दुरवस्था पाहून ते अतिशय व्यथित झाले. कोणत्याही परिस्थितीत शाळा सुधारायची, असा त्यांनी मनाशी पक्का निर्धार केला.

सुरवातीला त्यांनी स्वतःच्या खिशातून 20 हजार रुपये खर्च करून विविध साहित्य आणून शाळेची रंगरंगोटी केली. कामे अनेक करायची असल्यामुळे त्यांनी गावकऱ्यांना मदतीचे आवाहन केले. गावकऱ्यांनीही त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या विधायक कार्यात आपापल्या परीने मदत केली.

38 वर्षीय पडवल यांनी नंतर विकासाचा धडाकाच सुरू केला. समाजसुधारकांच्या फोटोंसह शैक्षणिक बॅनर, वृक्षारोपण, डिजिटलायझेशन व धूळखात पडलेले प्रोजेक्टर्स सुरू केले. शिवाय आरटीओ संजय पेंढारकर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त दिलेले संगणक मुलांसाठी लावला. एकूणच त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्वच सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या.

इतकेच नव्हे तर त्यांनी 'हर घर तिरंगा' या अभियानाप्रसंगी विद्युत रोषणाईदेखील केली होती. उल्लेखनीय म्हणजे, हे सर्व बदल त्यांनी अवघ्या दोन महिन्यांत केले. या कामात गावकऱ्यांसह खुर्सापार ग्रामपंचायत आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश वानखेडे यांनीही मदत केल्याचे पडवल यांनी सांगितले. एका खंगलेल्या झेड. पी. शाळेला नवे रूप देऊन विद्यार्थ्यांसाठी चांगले वातावरण उपलब्ध करून दिल्याबद्दल तमाम गावकरी त्यांची मनापासून प्रशंसा करीत आहेत.

प्रदीप पडवल एवढ्यावरच थांबणार नाहीत. भविष्यात शाळेत दर्जेदार खेळाडू तयार व्हावेत, यासाठी त्यांना क्रीडांगण तयार करायचे आहे. शिवाय मुला-मुलींसाठी चांगले स्वच्छतागृह, लॉन, सीसीटीव्ही बसविण्याचाही त्यांनी निर्णय घेतला आहे. एकूणच या शाळेला परिसरातील सर्वात सुंदर शाळा बनविण्यावर आपला भर राहणार असल्याचे ते म्हणाले.


## मोफत कायदेशीर सेवा

विमा क्लेम (एलआयसी, जीआयसी)
जमीन, पेमेंट, कुटुंब, अपघात,
बँकेची थकबाकी, कोणत्याही

प्रत्येक वक्तीला कुठे ना कुठे समाजात वावरत असताना अडचणी ला समोर जावे लागते. बरेचदा योग्य सल्ला न मिळाल्यामुळे अनेकांचे नुकसान झालेले आपण पाहतो. फोन वर माहिती मिळवून त्याचा उपयोग आपणास होऊ शकतो. कुठलाही संकोच न ठेवता आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ADVOCATE

वेळ सायं. 6 ते 9

ॲड. सिद्धार्थ कांबळे M.V.Sc, M.B.A ,L.L.M.

संपर्क : 9422539451, 9359381185 (अजनी पोलिस स्टेशनजवळ, बहुजन सौरभ कार्यालय, नागपूर-27)

> “ यशाकडे नेणारा सर्वात जवळचा मार्ग अजून तयार व्हायचा आहे. ”



संपादकीय

# ओबीसींना लोकशाही समजली तर...!

ओबीसींनी सामाजिक क्षेत्रात आजपर्यंत समाज जागृती निर्माण करण्यासाठी कोणीही प्रयत्न केले नाहीत कारण समाज जागृतीमुळे स्वत:ला ओबीसी समाजात प्रतिष्ठित समजणारे समाज नेते समजणारे स्वयंघोषित समाज नेत्यांच्या खऱ्या खोट्या अस्तित्वालाच धक्का बसण्याची भीती समाजात निर्माण होत असते त्यामुळे समाज जागृती करणाऱ्या सर्वसामान्य समाज बांधवांना दबावाखाली घेणे, मुस्कटदाबी करणे, धमकीचा प्रकार घडणे इत्यादी अवैचारिक आणि असंवैधानिक पद्धतीचा वापर केला जाऊ शकतो जेणेकरून ओबीसी समाजात कोणीही समाज जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करू नये हि संकुचित मानसिकता बदलणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्माण करतांनाच संविधानात अभिव्यक्ती स्वातंत्र्य अधोरेखित केले आहे. त्यासाठी संविधान निट समजणे गरजेचे राहील.

देशात ओबीसी समाजाची लोकसंख्या 52 टक्के आहे. हे आकडे वारी खूप जुनी आहे. ओबीसी म्हणजे कोण हेच किती तरी ओबीसी मधील जातीच्या उच्चशिक्षित लोकांना माहिती नाही. हे त्याच्या घरात गेल्यावर शंभर टक्के समजते. अन्यता ज्यांच्या हजार पिढीचा कोणता ही संबध नसलेल्या श्रद्धा, अंधश्रद्धा अज्ञान घरात दिसले नसते. त्या जागी भारतीय संविधान असते. इतर मागास वर्ग किंवा ओबीसी हा सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला प्रवर्ग (समाज) आहे. भारतात बहुसंख्य समाज हा मागासलेला (Backward class) असून पुढारलेला समाज (Forward class) म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य हा अल्पसंख्य आहे. या बहुसंख्य मागास समाजापैकी जो जास्त मागास आहे तो 'मुख्य मागास' समजला जातो. त्याला अनुसूचित जाती जमाती (एससी, एसटी) म्हटले जाते. या मुख्य मागासांपेक्षा कमी मागासलेल्या समाजघटकांना 'इतर मागास' ठरविण्यात आलेले आहे. भारतातील 41टक्के ते 52टक्के लोकसंख्या ओबीसीची आहे. मंडल आयोगाने महाराष्ट्रातील ओबीसी जातींची संख्या 360, तर देशात ओबीसी जातींची संख्या 3,744 इतकी नोंद केलेली आहे. इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या राष्ट्रीय आयोगाने 2,171 प्रमुख ओबीसींची यादी जाहीर केलेली आहे. ह्यांतील उपजाती जमेस धरल्यास ही संख्या आणखीही वाढू शकते. कुणबी, साळी, माळी, कोष्टी, तेली, भावसार, वाणी, शिंपी, नाभिक, पारीट, गुरव, गवळी, जंगम, पांचाळ, फुलली, रंगारी, सुतार, कासार, धनगर, भंडारी, तांडेल, तांबट, मोमीन, घडसी, विणकर, आगरी, कुंभार, सोनार, कोळी, लोहार, बंजारा अशा अनेक लक्षवेधी जाती ओबीसी मध्ये मोडतात. या प्रवर्गास केंद्रात 27 टक्के तर महाराष्ट्र राज्यात 19 टक्के आरक्षण भारतीय संविधांनाने म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले होते.पण ओबीसी *'गर्वसे कहो हम हिंदू है!'* म्हणायला लागला आणि त्याचे आजच्या घडीला अनेक ठिकाणचे आरक्षण पद्धतशीर पणे काढण्यास गेले तरी तो जागा होत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय जनतेला आपले संविधान निर्माण करून संवैधानिक अधिकार बहाल केले आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार प्रत्येक भारतीय नागरिकाला मिळाला आहे. भारतीय संविधान सर्वोच्च संविधान सर्वं सामान्य माणसाच्या भावना व्यक्त करणे, मत व्यक्त करणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आवाज न दाबणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा प्रयत्न न करणे, सर्व सामान्य माणसाच्या मनातील भावना मनातील विचार समाजहित दर्शक विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी प्रयत्न करणे,प्रोत्साहन देणे जनहितार्थ, समाजहितीर्थ, विकासात्मक बाबींचा विचार करता प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी पाठबळ देणे, प्रोत्साहन देणे. जिथे जनहित जिथे समाजहित असेल, त्या त्यावेळी सहकार्य करणे, जनहितार्थ, समाजहितार्थ प्रत्येक गोष्ट, प्रत्येक विषय, प्रत्येक प्रश्नांची उकल करणे, त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करणे, प्रोत्साहन देणे. हे ओबीसींना भारतीय संविधानाने दिले, पण ते समजून घेण्यासाठी ते संविधान वाचवे लागेल, पण ते आंबेडकरांनी त्यांच्या जातीसाठी लिहिले. बहुसंख्य ओबीसींनी ते वाचले नाही. भारतीय संस्कृतीत जनता महत्वाची नाही आहे, वर्ण महत्वाचा आहे. ओबीसी कुठल्या वर्णात येतात? भारताच्या इतिहासात,भारतीय संविधान हेच सर्वोच्च आहे. संविधान ज्याला समजले त्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार समजला. ज्याला संविधान समजले ती व्यक्ती तत्व मुद्दे मुळ विषय या मुख्य बाबींचा विचार करतो. कधीही विषयाला बगल देणार नाही. ज्याला संविधान समजले ती व्यक्ती कोणाच्याही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रयत्न करणार नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणार नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न करणार नाही. ज्यांना संविधान समजले ती व्यक्ती प्रत्येक मताचा सन्मान करणार यात शंकाच नाही. हे जर सत्य आहे तर राम मंदिराच्या आंदोलनात सर्वात जास्त ओबीसी होते. बळीसुद्धा ओबीसींचाच गेला. पण त्याला ट्रस्टीमध्ये प्रतिनिधित्व का नाही मिळाले. तिथे लोकशाही का नाही लागू झाली. यावर किती ओबीसी विचारवंतानी, साहित्यिकांनी, पत्रकारांनी, संपादकांनी प्राध्यापक शिक्षकांना लिहिले. का नाही लिहले? म्हणजेच ओबीसीनो लोकशाही समजली काय? ओबीसी समाजात एक मोठा वर्ग शिक्षकाचा आहे. शिक्षक म्हणजे ज्ञानाचे भांडार. शिक्षकांचे समाजासाठी देशासाठी महत्व व योगदान खूप मोठे असते. तेच देशासाठी सुजान नागरिक घडवितात. जसे ते शाळांमध्ये विध्यार्थी घडवितात तसेच काम ते शाळेबाहेर समाजात करू शकतात. ओबीसी समाजाचे शिक्षक कोणत्या विचारधारेच्या संघटनांमध्ये सभासद बनून मतदार बनतात. कोणत्या विचारधारेच्या संस्था संघटना मोठ्या करतात? भारतीय संविधान मानणाऱ्या की मनुवादी विचारांच्या संघटनांना प्राधान्य देतात. ओबीसी शिक्षकानो लोकशाही समजली काय?

देशातील ओबीसी शिक्षक, प्राध्यापक विविध क्षेत्रातील कर्तबगारी बजावण्यात यशस्वी होण्यासाठी ज्या हजारो विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करतात. ते शिक्षकच देशासाठी राजकीय क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, उद्योग क्षेत्रात, वैद्यकीय, शैक्षणिक, विज्ञान, सुरक्षा यंत्रणा, तंत्रज्ञान विकसित करणे अशा विविध प्रकारची पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करतात ते शिक्षकच सामाजिक, वैचारिक, नैतिकता, प्रामाणिकता सत्याची कास धरून वाटचाल करणारे नसतील तर? ओबीसी बहुसंख्य असून ही वैचारिक मानसिक गुलामच निर्माण होती. अशांना देशाचे राष्ट्रपती बनविले तरी ते मंदिरात जाऊन दर्शन घेण्याची हिंमत दाखवणार नाहीत. पायरीवर बसून दगडाच्या पायाच पडतील. कारण मनुवादी समाज व्यवस्थेत वर्ण व्यवस्थेनुसार त्यांना तो अधिकार नाही. भारतीय संविधानाने तो त्यांना फुकट दिला म्हणून त्याची त्याला किंमत नाही. एक राष्ट्रपती गुलाम बनून राहिला आता त्याजागी दुसरा आदिवासी विशेष महिलेची निवड झाली तिने ही वर्णव्यवस्थेनुसार मंदिरात झाडू मारून लायकी दाखवून दिली. इत्यादी अनेक गोष्टी लक्षात घेता त्याचे धडे देणारे हे शिक्षकच आहेत. ते कोणते शिक्षण देतात हे महत्वाचे आहे. शिक्षक म्हणजे शिक्षकच ते विज्ञान शिकवतात कि अंधश्रद्धा वाढवणारे अज्ञान हे परिस्थितीनुसार अवलंबून असते. विद्यामंदिरात विविध प्रकारचे विकासात्मक पैलु असणारे शिक्षकच देशाच्या, समाजाच्या उन्नतीसाठी विध्यार्थी घडवतात. ते विध्यार्थी पुढे सुजान नागरिक, मतदार आणि जाती-जातीचे पदाधिकारी, लोक प्रतिनिधी बनतात. तेव्हा संख्येची गणिते समोर येतात. अल्पसंख्याक कि बहुसंख्याक ओबीसी मगच जाहीरपणे विचारावे लागते ओबीसींनो लोकशाही समजली काय?

---

अमृतवाणी ही बुद्धाची



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330


# धम्मग्रंथ पठणापेक्षा धम्माचरण हे श्रेष्ठ होय

**(दोन मित्र भिक्खूंची गोष्ट, गाथा क्र.20)**

***अप्पम्पि चे सहितं भासमनो,***
***धमस्स होति अनुधम्मचारी।***
***रागञ्च दोसञ्च पहाय मोहं,***
***सम्मप्पजनो सुविमुत्तचित्तो।***
**अनुपादियानो इध वा हुरं वा,**
**स भागवा सामञ्ञस्स होति ॥ 20॥**

***अर्थ** : जरी धम्मग्रंथाचे अल्प पठण करीत असेल, मात्र राग, द्वेष व मोह विरहित राहून एखादी व्यक्ती धम्माप्रमाणे आचरण करीत असेल. बुद्धिमान, अनासक्त व सतत जागृत असेल आणि इहलोकात आणि परलोकातही कामवासनेत लिप्त नसेल, तर अशी व्यक्ती श्रमणत्वाची भागीदार असते.*

श्रावस्ती नगरातील जेतवन विहारात विहरत असताना भगवान बुद्धांनी वरील दोन्ही गाथा म्हटलेल्या आहेत. दोन परममित्रांनी भगवंताकडून दीक्षा ग्रहण केली व भिक्खू झाले. त्यापैकी भगवंतांचा संपूर्ण उपदेश तोंडपाठ करून घेण्याचे ठरविले व ध्यानमार्गाकडे दुर्लक्ष केले. त्याने संपूर्ण त्रिपिटक पाठ केले. त्रिपिटकधारी झाला व ठिकठिकाणी जाऊन भगवंताचा संपूर्ण उपदेश जसाचा तसा लोकांना सांगू लागला व अनेक भिक्खूंचा तो गुरू म्हणवू लागला.



दुसऱ्या मित्राने मात्र ध्यान मार्ग अवलंबण्याचा प्रयत्न केला व खडतर परिश्रम करून त्याने अर्हत पद प्राप्त केले. हे करताना त्याने मात्र मोजक्याच धम्म गाथांचा अभ्यास केला होता. म्हणून त्रिपिटकधारी होणे त्याला शक्य नव्हते. मात्र ध्यान मार्गातील एक गुरू म्हणून त्यालाही काही भिक्खू शिष्य म्हणून लाभले होते. त्याच्या शिष्यांनी त्याच्या अनुमतीने भगवान बुद्धांना भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा त्याने आनंदाने अनुमती दिला व सांगितले की भगवंताबरोबर असलेल्या 80 शिष्यांना तसेच त्याचा परममित्र त्रिपिटकधारी यालासुद्धा आपण सारे भेटून यावे.

काही दिवसानंतर श्रावस्ती येथे दोन्ही मित्रांची गाठ झाली. अर्हत प्राप्त मित्राला काही प्रश्न विचारून त्रिपिटकधारी मित्राने त्याचा अपमान करण्याचे ठरविले. बुद्धांनी त्याच्या मनात आलेले विचार ताडले. आपला मित्र त्रिपिटकातील एकही गाथा गाऊ शकत नाही, म्हणून त्याचा अपमान करण्याचा त्याचा उद्देश होता. बुद्धांना वाटले, त्रिपिटकाधाऱ्याने जर अर्हत भिक्खूचा असा अपमान केला तर तो खचितच नरकात पुनर्जन्म घेईल म्हणून भगवान बुद्ध करूणावास जेतवन विहारात फेरफटका मारण्याच्या उद्देशाने गंधकुटीच्या बाहेर पडून ते त्या दोघांकडे गेले व त्यांनी त्यांच्यासाठी तयार केलेल्या आसनावर प्रतिष्ठित झाले. त्यांनी पहिल्या ध्यानापासून ते आठव्या ध्यानापर्यंतची माहिती दोघांनाही आळीपाळीने विचारली. दोघांनीही त्याची उत्तरे बरोबर दिली. मात्र अर्हतपदाकडे नेणाऱ्या अवस्थांची माहिती त्रिपिटकधाऱ्याला बरोबर देता आली नाही. त्यावर तोच प्रश्न अर्हत असलेल्या भिक्खूला भगवंतांनी विचारला. त्यावर त्याने त्याचे योग्य असे उत्तर त्वरित दिले. नंतर भगवंतांनी अर्हत पदाकडे नेणाऱ्या उरलेल्या अवस्थाबद्दल अनुक्रमे एक एक प्रश्न त्रिपिटकधारी व अर्हत भिक्खूला विचारण्यास सुरूवात केली. परंतु त्रिपिटकधारी एकाही प्रश्नाचे उत्तर देऊ शकला नाही. मात्र अर्हत भिक्खूने प्रत्येक प्रश्नाचे समर्पक उत्तर दिले. तेव्हा पृथ्वीवरील व ब्रह्मलोकातील नागा व गरूडासहित सर्व देवतांनी त्या अर्हत भिक्खूंवर अभिनंदनाचा वर्षाव केला. हा अभिनंदनाचा वर्षाव ऐकून त्रिपिटकधारी भिक्खूचे शिष्य व सहकारी दुखावले गेले व बुद्धांना म्हणाले की, 'त्यांनी असे का केले? ज्या भिक्खूला एकही गाथा माहीत नाही अशा भिक्खूची स्तुती बुद्धांनी का केली? परंतु आपले गुरू, ज्यांना संपूर्ण त्रिपिटक पाठ आहे आणि ज्याचे 500 भिक्खू आहेत, अशा भिक्खूची जराही स्तुती केली नाही.'

त्यावर बुद्ध म्हणाले, 'भिक्खूंना, तुमच्या गुरूने माझा उपदेश पाठांतराने ग्रहण केला आहे. परंतु तुमच्या गुरूचा परम मित्र असलेल्या भिक्खूने तो उपदेश प्रत्यक्ष अनुभवला आहे. तुमचा गुरू गुराख्यासारख्या दुसऱ्यांच्या गायी मोजतो. एखादा गुराखी 500 गायी राखतो. तेव्हा 100 गायी राखणाऱ्या गुराख्याला तो तुच्छ समजतो. मात्र 500 गायींपैकी एकही गाय त्याची स्वतःची नसते. तो दुसऱ्याच्या गायी राखूनही जास्त गायी राखण्याचा अहंकार मात्र जपतो. तसेच तुमच्या गुरूचे आहे. त्याने नुसत्या गाथा पाठ केल्या आहेत. त्या अहंकाराने त्याला पछाडले आहे. मात्र त्या गाथांचा प्रत्यक्ष अनुभव त्याने अजून घेतला नाही. जो अनुभव दुसऱ्या भिक्खूने प्रत्यक्ष घेतला व त्याप्रमाणे आचरणात आणलेला आहे. म्हणून थोड्याही गाथा जरी पाठ असल्या आणि त्या आचरणात आणल्या, तरच त्याचा उपयोग होतो. त्या आचरणामुळेच माणूस श्रमणत्वाचा वाटेकरी होतो. अन्यथा नाही.' ■ ■

---

# सामाजिक चळवळीचे ऐतिहासिक कॅलेंडर

## 6 सप्टेंबर



एकनाथ सोमकुवर
9423678960

१. सायमन मंडळाच्या शिफारशीनुसार गव्हर्नर जनरल यांचेकडून गोलमेज परिषदेकरिता भारतातील निरनिराळ्या पक्षातील नेत्यांना आमंत्रण देण्यात आले. डॉ. आंबेडकरांनाही ६ सप्टेंबर १९३० रोजी अस्पृश्यांचे पुढारी म्हणून आमंत्रण देण्यात आले. मद्रासचे रावबहादूर श्रीनिवास ह्यांना पण अस्पृश्यांचे पुढारी म्हणून आमंत्रण देण्यात आले. अस्पृश्य समाजाच्या नेत्यांना भारतातील इतर राजकीय पुढाऱ्यांच्या बरोबरीचे आमंत्रण मिळणे हे डॉ.आंबेडकरांनी आपल्या बुद्धीने व पराक्रमाने घडवून आणलेले एक महान परिवर्तन होय.

२. ६ सप्टेंबर १९५४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या बाबतीतल्या सरकारी धोरणावर आणि हिंदूंच्या वृत्तीवर राज्यसभेत खरमरीत टीका केली. सर्व पडीत जमीन मध्यवर्ती सरकारच्या कक्षेत आणण्यासाठी घटनेत दुरूस्ती करावी अशी डॉ. आंबेडकरांनी सूचना केली. ते म्हणाले, मीठावर पुन्हा कर बसवावा. मिठावरील करामुळे सरकारला २० कोटी रुपयांचे उत्पन्न होईल. 'गांधी निधी' उभारून तो पैसा दलित वर्गाच्या उन्नतीसाठी उपयोगात आणावा. पडीत जमिनीवर दलित पुनर्वसाहत करण्यासाठी त्या निधीचा वापर करावा. मध्यवर्ती सरकारने जमिनीची किमान मर्यादा ठरवून आणि जास्त जमीन असेल तर ती घेऊन किंवा दलित वर्गाला जमीन विकत घ्यायला पैसे पुरवावे. ■ ■

---

# लई अवघड हाये गड्या उमगाया बाप रं....



रतन तायडे
94201 25761

***मनुष्य शिक्षणाने सुसंस्कारीत होतो आणि एखाद्या राज्यातील शिकलेल्या लोकांच्या संख्येवरून त्या राज्याला सुधारीत राज्य समजण्यात येते. मात्र, बदलत्या काळाच्या ओघात माणूस जलदगतीने विकासाचा पल्ला गाठत असल्याचे दिसून येत असले तरी, त्याच्यातील मानवतावादी विचार आणि संस्कार अंधुक होतांना दिसत आहे. सहसा शहरी भागात शिक्षित तर ग्रामीण भागात अशिक्षित लोकांचा अर्थात अडाणी लोकांचा भरणा अधिक असतो. कारण, शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि इतर सुव्यवस्थेसाठी खेड्यातील लोकांचा लोंढा शहराकडे धावतांना दिसतो. असे असले तरी, अशिक्षित आणि सुशिक्षित यांच्यात मानवता, बंधुता आणि एकमेकांप्रति आदरभाव व्यक्त करणे तसेच नातेसंबंध अबाधित ठेवण्यासाठी जी आपुलकी असावी लागते याबाबत तुलना केली असता दिसून येते की यात अशिक्षित म्हणजे ग्रामीण भागातील माणसे शहरी भागातील लोकांपेक्षा जरा जास्तच आदरातिथ्य करणारे असतात. असे आढळून येते.***

सुधारलेला समाज म्हणून घेत आत्मप्रौढीने मिरवत असलातरी, काही समाजमनाला सुन्न करणाऱ्या दुर्दैवी घटना बघितल्या की, सुशिक्षित आणि सुसंस्कृत समजणाऱ्या लोकांबद्दल चिड आल्याशिवाय राहत नाही. वाईट याचेच वाटते की, काहींच्या आपल्या जन्मदात्या विषयी निर्दयी प्रवृती व अक्षम्य दुर्लक्षामुळे तसेच मानवी मनाला न शोभणाऱ्या कृतीमुळे अख्ख्या सुशिक्षितांबद्धल प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे, अशा घटना वाढिस लागू नये याची दखल आणि दक्षता समाजाने घेण्याची गरज निर्माण झाली आहे. खरे म्हणजे प्रत्येक बापाला वाटते की, आपली मुलं शिकावे. त्यासाठी सधन असो की, सामान्य कुटुंबातील बाप आपल्यापरीने हाडाची काडी व रक्ताचे पाणी करून आपल्या मेहनतीचा घाम व डोळ्यातील अश्रू इतरांना न दिसू देता आपल्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहासाठी रात्रंदिवस राबत असतो. बाप माणूस आपले अंतर्मनातील दु:ख, वेदना कुणाच्याही लक्षात येऊ देत नाही अथवा त्याची वाच्यता कुठे करीत नाही.ही बाब गरीब, श्रीमंत अशा सर्वच बाप माणसांसाठी लागू आहे. फरक इतकाच की, सर्वजन आपापल्या कुवतीनुसार संसाराचा गाडा बिनदिक्कतपणे ओढत असतात. म्हणून बाप माणसांच्या एकूणच कर्तव्याची जाणीव आजच्या सुशिक्षित तरूणांना होणे अपेक्षित आहे. त्या अपेक्षेला व रक्ताच्या नात्याला जेव्हा आपल्याच मुलामुलींकडून निर्दयी पणे कलंकित केल्या जात असेल, तर नक्कीच आपल्या उच्चशिक्षित पणाला तसेच आपल्या उच्चपदाच्या नोकरीला मानवीय दृष्टीकोणातून विचार केल्यास कवडीची सुद्धा किंमत नसणार आहे, हे अत्यंत खेदाने म्हणावेसे वाटते. त्यासाठी हा लेख प्रपंच अतिशय जड अंतःकरणाने येथे मांडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे, डॉ. अरूण गोधमगांवकर, नामांकित बालरोग तज्ञ, ज्यांनी आयुष्यभर अनेक बालकांना जीवनदान दिले. ते अनेक दिवसांपासून लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील रूक्मिणी वृद्धाश्रमात राहत होते. ते नांदेड जिल्ह्यातील मुळचे नायगाव तालुक्यातील गोधमगांवचे होते, परंतु नंतर ते बिलोलीला स्थायिक झाले होते, त्यांनी आपल्या मुलाला एम.डी. डॉक्टर व मुलीलाही स्त्रिरोग तज्ञ डॉक्टर करून काही वर्षांपूर्वीच त्या दोघांनाही अमेरिकेला पाठवले होते, त्यांची सुन व जावई पण डॉक्टरच आहेत, सगळेच आपापल्या जीवनात व्यस्त असल्याने, मायबापाकडे लक्ष द्यायला कोणीच रिकामे नव्हते. इकडे उतारवयात डॉक्टर साहेबांच्या पत्नीचे निधन झाले तेव्हा, अमेरिकेमधून त्यांचा मुलगा अथवा मुलगी कोणीच आले नाहीत. शेवटी गावकऱ्यांनी अंत्यसंस्कार केले. त्यानंतर डॉ. अरूण गोधमगांवकर हे चार वर्षांपासून लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील रूक्मिणी वृद्धाश्रमात राहत असतांनाच, त्यांचेसुद्धा दुःखद निधन झाले. वृद्धाश्रम चालकाने त्यांच्या अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या मुलास, मुलीस आणि जावई यांना डॉक्टरांच्या निधनाची बातमी कळवली. 'कोणाचेही येणे होणार नाही', आमचा कसलाही आक्षेप नाही 'तुम्ही अंत्यविधी कार्यक्रम उरकून घ्या' असे सांगितले. अखेर तेथील आश्रम वासियांनी अतिशय जड अंतःकरणाने डॉक्टरांना अश्रू नयनांनी निरोप दिला. अशाच प्रकारची दुसरी माणसाचे मन हेलावून टाकणारी दुर्दैवी घटना अशी की, पुणे शहरातील निवृत्त बँक मॅनेजर मुलचंद शर्मा यांना अर्धांगवायू झाला होता. त्यांचा



मुलगा दक्षिण आफ्रिकेत उच्चपदावर कार्यरत असून, मुलगी कॅनडात नोकरी करते. काही दिवसांपूर्वी शर्मा यांची सेवा करणारा एक कंत्राटी नोकर त्यांना नागरमुनोळीतील पांडुरंग कुंभार यांच्या रूग्णालयात घेऊन आला होता. मात्र, कंत्राट संपल्याने तो शर्मा यांना चिकोडीतील शिवनेरी लॉजवर सोडून गेला. सदर बाब लॉज मालकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी चिकोडी पीएसआय बसणगौडा नेल यांना ही माहिती दिली. तेव्हा चिकोडी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. शेवटी चिकोडी पोलिसांनी मुलचंद शर्मा यांना चिकोडी रूग्णालयात दाखल केले. पण, तेथील डॉक्टरांनी अधिक उपचारासाठी त्यांना जिल्हा रुग्णालयात पाठविले. दिवसेंदिवस मुलचंद शर्मा यांची प्रकृती खालावत होती, त्यामुळे शनिवारी सदर वृद्ध मरण पावल्याचे सुचनापत्र रूग्णालयातून पोलिसांना आले. मृतदेह नागरमुनोळी गावाला आणला गेला. तिथे ग्रा. पं. सरपंच, सदस्य, बिडिओच्या मदतीने पोलिसांनी अंत्यसंस्कार केला. यावेळी पोलिसांच्या डोळ्यातही अश्रू तरळले. मुलचंद शर्मा यांचे निधन झाल्यानंतर पोलिसांनी त्यांचा मुलगा व मुलीशी अनेकवेळा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. शेवटी व्हॉट्अप कॉलवर मुलीशी संपर्क झाला. पोलिसांनी तीला तिच्या वडिलांचे निधन झाल्याची बातमी दिली. यावर मुलीने त्यांचा माझा काही संबंध नाही. आमच्या कुटुंबाचा विषय तुम्हाला कळणार नाही. तुम्हाला आम्ही उपचार द्या म्हणून सांगितलेले नाही. उगीच आम्हाला त्रास देऊ नका. तुम्हाला पुढील क्रियाकर्म करायचे असल्यास करा. नाहीतर मृतदेह फेकून द्या. असे निर्दयी वक्तव्य केले. यावरून कळून येते की जिवंत असतांना अनेक बाप माणसं आपल्या मुलामुलींना चांगले शिक्षण देऊन परदेशी पाठवतात, पण त्यांच्यावर चांगले संस्कार करण्यास विसरतात. कारण, आपल्या बापाने अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आपल्याला शिक्षण शिकवून उच्चशिक्षित केले. त्यामुळेच आपण उच्चपदावर कार्यरत आहोत, याची जाणीव न ठेवता पाश्चिमात्य संस्कृतीत रममाण होऊन आणि गडगंज पैसा असूनही आपल्या आई बापाला अंतिम क्षणीसुद्धा न भेटणाऱ्या निर्दयी मुलं आणि मुलींचा जितका निषेध करावा तितका थोडाच होणार आहे. आजच्या काळात सुधारलेल्या समाजातील तरूणाईचे बदलणारे स्वरूप बघता नागराज मंजुळे प्रस्तुत 'बापल्योक' चित्रपटातील अजय गोगावले यांनी गायलेल्या 'लई अवघड हाये गड्या उमगाया बाप रं.' या गिताचे हुबेहूब बोल खरे असल्याचे दिसून येते. कारण ज्यांना बाप समजला तीच खरी संतान, अन्यथा रक्ताच्या नात्याला काय अर्थ उरतो? जे मायबापाला म्हातारपणात सांभाळून आधार देणे तर दूरच, परंतु त्यांच्या अंतिम क्षणालाही त्यांची मुलंमुली उपस्थित राहु शकत नाही. केवढे हे मायबापांचे दुर्दैव...! ■ ■

---

# एक राष्ट्र एक निवडणूक : निव्वळ बौद्धिक दिवाळखोरी

***भारताचे माननीय प्रधानमंत्री सातत्याने एक राष्ट्र एक निवडणूक हा विचार मांडत असतात. त्यास अजित पवार सारखी काही मंडळी या कारणाने समर्पण देतात की सातत्याने होणाऱ्या निवडणुकीमुळे विकासास बाधा पोहोचते. कारण निवडणूक आचार संहिता लागते आणि सरकार काही निर्णय घेऊ शकत नाही. परंतु आधी घेतलेल्या निर्णयाच्या कामास निवडणुकीमुळे कुठलीच बाधा येत नाही, हे येथे समजून घेणे जरुरीचे आहे.***

हे लोकशाहीच्या विपरीत असे तत्व आहे. जगातील काही देशामध्ये जर निवडून आलेले प्रतिनिधी सरकार हे जनविरोधी अथवा आपली मनमानी करीत असेल तर त्यास परत बोलविण्याचा किंवा ते सरकार रद्दबादल करण्याचा अधिकार जनतेस आहे. हे लोकशाहिस धरून आहे. प्रत्येक पक्षास आपला जाहीरनामा जाहीर करून मतदान घ्यायचे असते आणि जाहिरनाम्याच्या बाहेर निवडून आलेल्या सरकारास जाता येत नाही. जाहीरनामाच्या बाहेरचे काही करायचे असल्यास त्या विषयावर पुनः जनमत घ्यावे लागते. ही लोकशाही प्रणाली आहे. भारतात तर आपण बघतो की निवडणूक जिंकण्यासाठी अनेक खोटी आश्वासाने गरीब भोळ्याभाबड्या जनतेस दिली जातात नंतर त्यास निर्लज्ज पने जुमला असे ही म्हटल्या जाते. खोटे बोलून जनतेची मते घेणे हा जनते सोबत विश्वासघात आहे.

आजकाल आपल्या देशात त्याचा खुलेआम वापर होताना दिसत आहे. निवडून आलेले सरकार आपण पाच वर्ष बदलू शकत नाही. आलिया गासी असावे सादर ह्या प्रमाणे जनतेस मार सहन करावा लागतो. परंतु वेगवेगळ्या वेळी होणाऱ्या राज्य सरकारच्या निवडणूक केंद्र सरकारस फीड बैंक अर्थात आपली चांगली किंवा वाईट प्रतिक्रिया देण्यास उपयोगी पडतात. देशात एक देश एक निवडणूक झाल्यास ही फीड बँक व्यवस्था खतम होईल, जे लोकशाहीच्या दृष्टीने अतिशय हानीकारक आहे. हा लोकशाहीचा श्वास रोखण्याचा प्रकार आहे. ही बौद्धिक दिवाळखोरीसुद्धा आहे. ह्याचे कारण की कधी एके काली केंद्र सरकार आणि बहुतांश राज्य सरकार यांच्या निवडणूक एकत्रित व्हायच्या मग त्या आता वेगवेगळ्या काळात का होतात? कारण की जर एखाद्या राज्यात संवैधानिक अपयशाची स्थिती निर्माण झाल्यास केंद्र सरकार कलम 35 टक्केचा वापर करून त्या राज्याचे सरकार बरखास्त करू शकते. अर्थात येथे पाच वर्षा आधीच निवडणुका घ्याव्या लागतील. आणीबाणीत केंद्र सरकार एका वर्षाने निवडणूक लांबणीवर टाकू शकते. कुठल्याच पक्षाला किंवा गटाला पूर्ण बहुमत न मिळाल्यास काही काळ राष्ट्रपती राजवट लाऊन पुनः निवडणूक होऊ शकते. हे सर्व प्रकार आज तुम्ही एक देश एक निवडणूक या धोरणावर घेतल्यावर ही होऊ शकते. म्हणजे पुनः निवडणूक वेगवेगळ्या काळात होतील. आता जर देश आणि राज्य यांची निवडणूक एकत्र घायची झाल्यास काही राज्य सरकारचा पाच वर्षाचा कल कमी करावा लागेल तर काहींच वाढवावा लागेल हा जनमताचा अनादर ठरेल. एकूणच हे निवळ बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण आहे.




संसदेत एखादे बिल पास करायचे तर त्यास लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहाची बहुमताने मान्यता लागते. लोकसभेचे प्रतिनिधी हे देशभरातून सरळ जनतेतून निवडून जातात. परंतु राज्य सभेचे प्रतिनिधी हे राज्याच्या आमदारांकडून निवडून गेलेले राज्याचे प्रतिनिधी असतात. लोकसभा ही प्रत्येक पाच वर्षाने विसर्जित होते. परंतु राज्यसभा कधीच विसर्जित होत नाही. तर प्रत्येक दोन वर्षाने त्याचे एक तृतीयांश प्रतिनिधी निवृत होतात आणि तेवढेच नवीन दाखल होतात. राज्याच्या निवडणूक वेगवेगळ्या वेळेस घेतल्यास हे नव्याने दाखल होणारे प्रतिनिधी, विरोधी पक्षांची सरकारे राज्यात निवडून आल्यास लोकसभेत सत्तारूढ पक्षाचे राज्यसभेतील बळ कमी करू शकते. त्यामुळे फक्त लोकसभेत बहुमत आहे. म्हणून कुठलेही बिल पास करण्याच्या केंद्र सरकारच्या मनमानीस लगाम लावू शकतात. राज्यसभेचे प्रत्येक दोन वर्षांनी बदलणारे संख्याबळ हेसुद्धा एका फीड बँक व्यवस्थेसारखे काम करते. म्हणून निवडणूक वेगवेगळ्या वेळेस होणे हे लोकशाहीच्या हिताचे आहे.

एक देश एक निवडणूक म्हणजे जनतेने आपले पूर्ण हक्क आणि अधिकार पाच वर्षासाठी राज्यकर्त्या पक्षास बहाल केल्यासारखे होईल. ते सरकार जर मनमानी करु लागले तर पाच वर्ष पश्चाताप करण्याव्यतिरिक्त जनतेच्या हातात काहीच राहणार नाही. त्यामुळे वेगवेगळ्या वेळात निवडणुका हे जनतेच्या हातातील राज्यकर्त्या वर्गावरील लगाम आहे. हा लगम जनतेने कुठल्याही परिस्थितीत राज्यकर्त्यांच्या कोणत्याही आश्वासनास वा धोरणास बळी न पडता आपल्या हातात राखून ठेवावा.

माननीय प्रधानमंत्री लोकप्रिय आहेत, त्यांनी आहे त्या स्थितीत निवडणूक घेऊन विजय प्राप्त करावा, संवैधानिक प्रक्रियेशी केलेली छेडछाड भारतीय जनता सहन करीत नाही. ह्याचे विपरीत परिणाम होईल. कर्नाटकात लोकांनी निवडलेले सरकार उलथून पडले. तेव्हा लोकानी भाजपाचे संख्याबळ कमी केले. पुनः अश्या चुका केल्यास संपूर्ण भाजप पक्षच भारतीय जनता नामशेष करेल. मोदी काही काळासाठी आहे. तर भाजपा हा सदा सर्वकाळ टिकणारा पक्ष आहे. भाजपामुळे या देशात दोन मजबूत पक्ष आहेत. त्यामुळे काँग्रेसलासुद्धा वठणीवर ठेवता येते हे भाजपा सरकार आल्यामुळे कळले. भाजपा पक्षात भविष्यातील अनेक पिढीचे नेतृत्व लपलेले आहे. त्यामुळे एकूणच भाजपा हा पक्ष फक्त एका व्यक्तीच्या महत्वाकांक्षेसाठी वेठीस धरू नये असे आम्हास वाटते.



प्रदीप ढोबळे
मो. 9820350758

सातत्याने होणाऱ्या निवडणुकीतून आचार संहिते मुळे नवीन निर्णय घेत येत नसतील तर निवडणुकीचा काळ कमी करावा. मागे वेस्ट बंगालची निवडणूक सात की आठ टप्प्यात झाली दोन महीने निवडणूक चालत होती. त्यामुळे एक निवडणूक एक दिवस या धोरणाचा अवलंब करून संपूर्ण देशची वा राज्याची निवडणूक एका दिवसात घेऊन दुसऱ्या दिवशी मतमोजणी करून निकाल लावावा आणि निवडणुकीचा कालखंड कमी करावा. ■ ■

"डोक शांत असेल तर निर्णय चुकत नाही, भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत."

# संविधानाचे मारेकरी

*भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाल्या नंतरही भारतीय जनता ही प्रजाच होती. कारण तेव्हाही देशात ब्रिटीशांचेच कायदे अमलात होते. 26 जानेवारी 1950 रोजी स्वतंत्र भारताची राज्यघटना देशाने स्वीकृत केल्यानंतरच खऱ्या अर्थाने येथील जनतेला प्रजासत्ताक गणराज्याचे नागरिक म्हणून अधिकार प्राप्त झाले. 2014 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्याचा गवगवा करणारे नतभ्रष्ट लोक भारताच्या वर्तमान स्वातंत्र्योतर काळाला अमृतकाळ म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत आहेत.*



भारत देश 2047 साली कसा स्वर्गतुल्य राहील याचे चविष्ट चर्वणही करू लागले आहेत. जनते समोर असा चकवा निर्माण करण्यामागे काय दडले आहे, त्याचा आढावा घेतला तर त्यामागची भूमिका म्हणजे हिंदू राष्ट्राची निर्मिती आणि ते घोषित करण्याची आहे. हे उघड उघड स्पष्ट आहे. भारतीय राज्यघटना त्यांच्या सुप्त हेतूला खरा अडथळा ठरत आहे. संविधान बदलण्याची भाषा करणारे मनुवादी डोके वर काढत आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष विवेक देबरॉय यांनी यावर्षी स्वातंत्र्यदिनी लिहिलेल्या लेखात नवीन संविधानाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आर्थिक सल्लागाराने आर्थिक बाबतीत सल्ला देण्याऐवजी संविधान बदला विषयी भाष्य करणे याचा अर्थच असा आहे की या विधानामागे त्यांचा बोलविता धनी हा वेगळाच आहे. विवेक देबरॉय यांच्या मते 1950 मध्ये जे संविधान होते ते सध्या अस्तीत्वातच नाही, त्यात 105 संशोधन झाले आहे म्हणून ते जुने झाले आहे. 2047 साली भारताच्या स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा होतांना नव्या राज्यघटनेची गरज असल्याचे देबरॉय म्हणत आहे. हे वक्तव्य करणारी व्यक्ति काही साधारण नाही. त्यामुळे त्यांच्या या विधानातून प्रधानमंत्र्यांचाच मानस प्रतिबिंबित होत असल्याची प्रचिती येते. देबरॉयच्या लेखाची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते.

प्रबळ विरोधी पक्ष अभावी संविधान बदलण्याची भाषा पूर्वीपेक्षा आता बेधडकपणे केली जात आहे. विवेक देबरॉय यांच्या मते लिखित संविधानाचे आयुष्य केवळ 17 वर्षाचेच असते. अर्थात ही आयुर्मयादा ठरविण्याचा अधिकार देबरॉय यांना कोणी दिला? त्याचा आधार काय? किंवा ते घटनादत्त आहेत काय? 17 वर्षाच्या कालखंडाबाबत तत्कालीन घटनाकारांनी संसदेत चर्चा केली होती काय? जगाच्या दृष्टीने पाहिले असता दोनशे वर्षापासून चालू असलेली अमेरिकन राज्यघटना अजूनही बदलली नाही. भारतीय संविधानाला तर शतकही पूर्ण झाले नाही. जर 17 वर्षात संविधान कालबाह्य झाले असेल तर मनूस्मृती, वेद, पुराण हे ग्रंथ हजारो वर्षापूर्वीचे आहेत, असे म्हटले जाते. त्यानूसार सर्वप्रथम हे धर्मग्रंथ बदलण्याचा उच्चार हे देबरॉय स्वप्नातही करणार नाहीत. संविधान बदलल्यामुळे संविधानातील प्रत्येक व्यक्तीस मिळालेले समतेचे एक व्यक्ती एक मत हे तत्व नाकारण्याचा कट आहे हे नागड सत्य आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि न्याय या वैश्विक मानवी मुल्यांना नाकारण्याचे षडयंत्र या मागे आहे. इतिहासात स्वतःचे नाव नोंदविण्यासाठी मोदीं नवीन राज्यघटना लागू करून संसदीय पद्धती ऐवजी अध्यक्षीय प्रणाली तर आणू पाहत नाही ना ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. कारण स्वतःच्या नावाची इतिहासात नोंद व्हावी म्हणून नवीन संसद भवन (सेंट्रल व्हीस्टा) निर्माण करून स्वहस्ते उदघाटन करणे हा इतिहासात अजरामर होण्याचाच प्रयत्न असावा असे वाटते.



**श्रीराम बनसोड, 8208617748**

वास्तविक भारताचे संविधान आजपर्यंत पुर्णतः लागूच झाले नाही. तरी सुद्धा संविधान बदलणाऱ्या विघटनकारी शक्ती अधून मधून डोके वर काढत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि प्रणीत सत्ताधारी यांचा राज्यघटनेला सुरुवातीपासूनच उघड विरोध आहे. याचे एक कारण म्हणजे भारताच्या संविधानाची निर्मिती एका अस्पृश्य व्यक्तीने केली आहे. अन्य धर्म ग्रंथाप्रमाणे देशाचे संविधान ब्राम्हणांनी लिहिले नाही आणि भारतीय संविधानामूळे हजारो वर्षांपासून अस्तीत्वात असलेल्या ब्राम्हणी श्रेष्ठत्वालाच तडा जात आहे. त्यामुळे हा आकस आणि विरोध वारंवार उफाळून येत असतो. संघाचे (आरएसएस) तत्कालीन सरसंघसंचालक गोलवलकर यांनी 'बंच ऑफ थॉट' या पुस्तकात उल्लेख केल्याप्रमाणे 'भारताचे संविधान पाश्चात्य देशाच्या संविधानातून उचलाउचल करून, तुकडे जोडून तयार केलेले संविधान असून ते कसल्याशा लुळ्यापांगळ्या तत्वांच्या आधारे शिवलेली गोधडीच' असल्याचा आरोप केला आहे. अर्थात गोलवलकरांचे आरोप हे केवळ आकसापोटी आणि अनैतिकतेवर आधारित आहेत. 1997 साली अरुण शौरी ने 'वार्शिपिंग फॉल्स गॉडस' नावाच्या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात गरळ ओकली होती. डॉ. बाबासाहेबांना मिळालेले राज्यघटनेच्या निर्मितीचे श्रेय त्यांनी आपल्या लेखातून अमान्य केले. उल्लेखनीय बाब म्हणजे दुसऱ्याच वर्षी शौरींना राज्यसभेची खासदारकी आणि अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये कॅबिनेट मंत्रीपद मिळाले. याच अटल बिहारी वाजपेयींनी फेब्रुवारी 2000 मध्ये 'राज्यघटना पुनर्विलोकन आयोग' स्थापन करून संविधान बदलण्यासाठी पाऊल उचलले होते. जनाक्रोशमूळे त्यांचा हा अघोरी डाव फसला. 'आम्ही राज्यघटना बदलायला सत्तेत आलो' असे केंद्रीय मंत्री अनंतकुमार हेगडे यांनी म्हटले होते. संसदेत गदारोळ झाल्यामुळे हेगडेने शेवटी माफी मागितली. दिनांक 9 ऑगस्ट 2018 रोजी नवी दिल्ली येथील जंतरमंतर वर काही समाजकंटकांनी संविधानाची प्रत जाळली आणि डॉ. बाबासाहेबांच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. 12 ऑगस्ट 2022 रोजी अलाहाबाद येथे धर्मपरिषद आयोजित केली होती.

हे सर्व संभाव्य आरोप लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यापूर्वीच 4 नोहेंबर 1948 च्या भाषणात याचे सविस्तर उत्तर दिले आहे. डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'असे आरोप संविधानाच्या अपूऱ्या अभ्यासावर आधारित आहे. केवळ विशिष्ट वर्गातील बहुसंख्य लोकांनीच नव्हे तर सर्वांनी घटनात्मक नैतिकतेचे पालन करणे ही स्वतंत्र आणि शांततामय शासनासाठी अनिवार्य अट आहे.' या भाषणाच्या उत्तरार्धात डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'जगातील कोणतेही संविधान परिपूर्ण असत नाही आणि मसूदा संविधान अधिक चांगले करण्याच्या उद्देशाने मसूदा समिती स्वतःच काही दुरुस्त्या सुचविणार आहे. मसूदा समितीने निर्माण केलेले संविधान देशासाठी निश्चितपणे चांगले आहे, व्यवहार्य आहे, लवचिक आहे आणि देशाला शांतता आणि युद्धजन्य या दोन्ही परिस्थितीत एकसंघ ठेवण्यासाठी समर्थ आहे. संविधाना अंतर्गत जर काही चुकीच्या गोष्टी घडल्या तर आपले संविधान वाईट आहे हे त्याचे कारण असणार नाही. आपल्याला असे म्हणावे लागेल की माणूस दुष्ट होता.' दुष्ट माणसांचीच भरमार आहे. धर्माधीष्ठित राजकारणाचा जोर वाढला आहे. घटनेच्या मुलभूत संरचनेला धक्का द्यायचा, असा मागील नऊ वर्षातील भाजपचा राज्यकारभार आहे.

2024 च्या निवडणूकीत या दुष्ट प्रवृत्तींना बाहेरचा रस्ता दाखविण्याचे कार्य लोकशाही समर्थक जनतेवर आहे. संविधान बदलणाऱ्यांनाच बदलावे लागेल. ही संधी दवडू नये. अन्यथा आपण आपल्याच पायावर धोंडा मारून घेण्यासारखे होईल. ■■

## क्षमता

**अनंतायन**



**ॲड. अनंत खेळकर**
**मो. 9370061677**

कणभर सोने हवे असेल तर मणभर माती ऊपसावी लागते. त्यासाठी माणसाला ध्येयाचे वेड लागायला हवे. वेडी माणसेच इतिहास घडवतात. अति शहाणी माणसे केवळ विचार करीत राहतात. पण कोणतेही असामान्य कार्य करायचे असल्यास अंगी जिद्द, संयम, परिश्रम करण्याची तयारी अन् प्रचंड इच्छाशक्ती असावी लागते. छन्नी अन् हातोड्याचे घाव सोसण्याची ज्या दगडाची तयारी असते त्यालाच देवत्व प्राप्त होते. त्यानंतर युगानुयुगे सर्वजण त्याचेपुढे श्रद्धेने नतमस्तक होतात. जी हवी ती गोष्ट मिळवण्यासाठी परमेश्वराने आपल्याला दोन हात, दोन पाय, दोन डोळे अन् मेंदू दिला आहे, फक्त त्याचा वापर कसा अन् केव्हा करावा. ह्याचे तंत्र अवगत करावे लागते. परिस्थिती विपरीत आहे. म्हणून आपल्या स्वप्नांना सोडून देऊ नये. तुम्ही जे सोडून देता त्या संधीचा फायदा ऊचलायला कित्तेकजण हे टपलेलेच असतात. योग्य वेळ आल्यावर बघू असा विचार करीत बसले तर कुणी साधी सुरूवातही करू शकत नाही. मग यश मिळवणे हे केवळ एक स्वप्नरंजन ठरते. मिळालेला प्रत्येक क्षण आपले स्वप्न सत्त्यात ऊतरवण्यासाठी मिळलेली संधी असते. स्वतःचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी जे सहा शब्द तुम्हाला सतत प्रेरीत करतात ते म्हणजे 'होय! मी हे नक्कीच करू शकतो 'स्वप्न पूर्ण करण्यासाठी आकर्षक व्यक्तीमत्व अन् सुंदर चेहऱ्याची नव्हे तर, योग्य ते कौशल्य अन् क्षमतेची आवश्यकता असते. स्वप्न प्रत्यक्षात ऊतरवण्यासाठी केलेले अथक परिश्रम कुणालाही त्या स्थानावर नेऊन बसवतात, जेथे स्वतः नशीब त्या व्यक्तीला शोधत येते. बऱ्याच व्यक्ती आपले स्वप्न साकार करू शकत नाहीत, म्हणून आपणही त्या बऱ्याच व्यक्तींच्या पंगतीत बसु नये. नकारात्मक विचारांची मंडळी वाऱ्याविषयी तक्रारी करीत राहतात, तर सकारात्मक व्यक्ती वारा योग्य दिशेने वाहण्याची प्रतिक्षा करतात. पण कर्तबगार व्यक्ती ह्या वाऱ्याच्या दिशेप्रमाणे शिडाला दिशा देतात. कारण त्यांना ह्याची जाणिव असते की, घडणाऱ्या प्रत्येकच घटनेला नियंत्रित करणे जरी आपल्या हातात नसले तरी त्याचा सामना करून त्यावर नियंत्रण कसे करून कसा मार्ग काढता येईल ह्यासाठी प्रयत्न करणे आपल्या हातात असते. अयशस्वी लोक बहाणे सांगतात. यशस्वी लोक मार्ग शोधतात. ज्याला यशाचे शिखर गाठायचे असते ते आलेल्या संकटातून, अडचणीतून मार्ग शोधतात अन् पुढे जातात.

म्हणून उद्देश मोठा ठेवा. तर आत्मविश्वास मोठा होईल. आत्मविश्वास मोठा झाला तर कर्तृत्व मोठे होईल. कर्तृत्व मोठे झाले तर फलप्राप्तीही मोठी होईल.

**बुझी हुई आग भी जल सकती है।**
**तुफान से कश्ती भी निकल सकती है।**
**हो के मायूस ना बदलों अपने इरादे।**
**तुम्हारे इरादों से दुनियाँ बदल सकती हैं।** ■■

## राजकारण्यांकडून सांस्कृतिक बदल होणे नाही!

*त्यात ते यशस्वी सुध्दा होत आहे. आर्थिकतेच्या मुद्दावर लढण्यास सर्वच तयार असतात? परंतु सामाजिक परिवर्तनाची चळवळ गतिमान करण्यास तीचे चक्र फिरवण्यास हिंमत करीत नाही. जे काही लोक ही सामाजिक जागृती आणत आहेत त्यांच्यातही एक वाक्यता नाही.*




एका तालासुरात चालण्यास तयार नाही. तर जो तो मी म्हणतो तेच खरे आहे. मला जे काही उमगले आहे. समजले आहे त्यावर सर्वांनी चालावे त्याचे अनुसरण करावे त्यांचा अहंकार आडवा येत असतो नेतृत्व पक्के करण्यासाठी समाजाला आपल्या मागे ओढण्याचा प्रयत्न करतो वेळप्रसंगी व्यवस्थेच्या ठेकेदारांचे साह्य घेतो. तात्विक मुद्यावर चर्चा करुन संभ्रम निर्माण करतो. एकाच ध्येया प्रती असलेलया. संघटना अनेक गटातटात विभागल्या जात आहे. व याचा फायदा यथास्थितीवादयाना होत आहे. म्हणून याचा गांभीर्याने विचार करून आपली दिशा ठरविली पाहिजे ध्येय हे प्रमुख ठेउन ध्येयापरती संघटनेचा वापर केला पाहिजे. सांस्कृतिक पातळींवर बदल घडुन येणे गरजेचे आहे त्यादृष्टीने विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. भटकत जाणारी चळवळ मूळ मार्गावर येणे काळाची गरज आहे.

वापरल्या जाणारे नेते व लोक. हजारो वर्षांपासून बहुजन समाजाला गुलाम केल्यामुळे त्याची मानसिकता गुलामीची झाली आहे वारंवार एकाच गोष्टीचा उल्लेख होत असल्यामुळे तीच खरी गोष्ट अशी श्रद्धा झालेली आहे. ज्या प्रमाणात प्रचार माध्यमे त्यांच्या ताब्यात आहेत त्यांना जे आवडेल व त्यांच्या सोयीचे आहे तेच प्रचार माध्यमातून प्रसारित होत असते. ते आपलीसोय पाहून इतिहासाची मांडणी करित असतात अशा वेळी आपल्या आदरणीय महापुरुषांचा अनादर झाला तरी चालेल कारण त्यांचा स्वार्थ हा सनातन असतो आपल्या स्वार्थासाठी ते काहीही करू शकतात.

आर्य हेपरकिय असुन त्यांनी या देशावर आक्रमण करून येथील मुळरहिवासी यांना हरविले व आपली सत्ता प्रस्थापित केली आणि आर्य हे बाहेरून आले हे टिळक व सावरकरांना मान्य आहे. टिळकांनी आर्य उत्तर धृवापृलीकडुन आले असे सांगितले. बाळगाधर टिळक रा. स्वयं सघापासून तर येथील लोक हे कम्युनिस्टापर्यंत श्रद्धेय व्यक्ती. सरसंघचालक रा.स्व.संघ उत्तर धृव बिहार राज्यात असल्याचा शोध लावून आर्यमुळचे इथले असल्याचे सांगितले व टिळकांना खोटे ठरविले राम मंदिराच्या मुद्यावरसुद्धा रा. स्व. संघाच्या शाखेचे परस्पर विरोधी मत असल्याचे दर्शविले जाते भारतीय जनता पक्षाच्या प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी याना मुखवटेधारन केलेले म्हटले गेले तर विश्व हिंदू परिषदेचे अशोक सिंघल यांनी त्यांना कलाकार म्हटले आहे

कारण लोकांची सहानुभूती मिळविण्यासाठी एका चेहऱ्यावर अनेक चेहरे धारन करावे लागतात. सरकार चालवण्याचे एकमेकांविरुद्ध मत असलेल्या लोकांना सोबत घेऊन चालायचे असते कधी पुरोगामित्वाचे सोंग आणावयाचे तर कधी उदारवादी असल्याची प्रतीमा जाणुन बुजून रूजवायची त्याचे ध्येय हे हिंदू राष्ट्र प्रस्थापित करायचे आहे व त्यासाठी अनेक कोलाट उड्या मारुन ध्येयाप्रती सजग आहेत. वामनी अधिसत्ता निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. हिंदूच्या नावाने सर्वांना गोळा करता येते म्हणून ते नेहमी



**विनायकराव जामगडे**
**मो.9372456389**

हिंदू शब्दाचा उच्चारकरित असतात. 1905 मध्ये हिंदू महासभेची स्थापना होते. सुरुवातीपासूनच मुस्लीम द्वेष पेरण्याचे काम सुरू आहे त्यासाठी त्यांनी सार्वजनिक गणपती उत्सवाचे कार्यक्रम आयोजित करून त्याद्वारे मुस्लीम द्वेष सारखा तेवत ठेवला. त्याच्या परिणाम मुस्लिमांना मुस्लीम लीग स्थापन करावी लागली. क्रियेची प्रतिक्रिया होत असते होत असते परंतु जनमानसाच्या मनावर मुस्लीम आक्रमक असून त्यांनी येथील धर्म बाटविला. तलवारीच्या जोरावर आपल्या धर्माचा प्रसार केला याच्या मोठ्या प्रमाणावर प्रचार केला गेला व ह्यासाठी ज्याचा ज्याचा उपयोग करता येईल त्यांचा उपयोग केला. ज्यांनी शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करण्यास नकार दिला कारण शिवाजी क्षत्रिय नसून शूद्र आहेत शुद्राला राज्याभिषेक करण्याचा अधिकार नाही त्यासाठी शिवाजींना काशी वरून गंगा भटास आणावे लागले जास्तीच्या मोहरा देऊन राज्याभिषेक करावा लागला त्याच शिवाजी महाराजांच्या गो-ब्राह्मण प्रतिपालक म्हणून उदो-उदो केला व त्याच शिवाजी महाराजावर इंग्रज लेखका करवी त्यांची बदनामी होईल असे पुस्तक लिहून घेतले म्हणजे उपयोग होतो तोपर्यंत करून घ्यायचा व सोयीचे नसेल तर त्याला बदनाम करायचे.

तुकाराम महाराजांच्या पोथ्या पाण्यात बुडवायच्या त्यांना छळायचे तरी त्यांची लोकप्रियता वाढत आहे म्हणून ते सदेह वैकुंठाला पुष्पक विमानातून गेले असा प्रचार करायचा आपण काही अभंग लिहायचे व ते तुकाराम महाराजांच्या नावाने प्रचारित करायचे चोखामेळा सारख्या संताला मंदिर प्रवेश करू दिला नाही त्याला बाहेरून विठ्ठलाचे दर्शन घ्यावे लागले जातीनिहाय संतांच्या प्रचार करायचा जेणेकरून ति जात संतांच्या नावांनी एकत्र येऊन उच्च जातीय सत्ता स्थापन करण्यास मदत होईल. ह्यांना वापरून घेता येईल म्हणजे ते उपयोग करण्यास यशस्वी होतात. बहुजन लोक त्यांच्या प्रचारात वाहवत जातात त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेवर चर्चा केली तर बहूजनाना राग येतो तुम्ही एका जातीच्या द्वेष करता असा आरोप करीत असतात ज्यांनी हजारो वर्षापासून जातीय विभागून माणुसकी हिसकावली बौद्धिक दृष्ट्या गुलाम केले स्वत स्वतःची बुद्धी वापरू द्यायची नाही अशी व्यवस्था निर्माण केली त्याबद्दल कोणी काही बोलण्यास तयार नाही. आजही स्त्रियांना काही मंदिरात जाण्याची बंदी आहे वर्णाश्रमानुसार वागण्यास बाध्य केली जाते प्रचार माध्यमातून वेद, स्मृति, पुराण, पारायण केले जाते त्यावर अनेक संत निर्माण करून त्यांच्या प्रवचनाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिली जाते हे संत नेहमीच ह्या व्यवस्थेला मजबूत करण्याच्या दृष्टीने उपयोगी पडत असतात ज्या प्रमाणात भागवत सप्ताह केला जातो ज्ञानेश्वरीचे पारायण केले जाते यज्ञ करून यज्ञ संस्कृती वाढवली जाते कीर्तनात भजनात सतत प्रचार सुरू आहे याची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने काही हालचाली केल्या तर ब्राह्मणापेक्षा बहुजन समाजाला चीड येते ते संताप व्यक्त करतात कारण बहुजन समाजाची धडपड ही दुसऱ्या नंबर ची जागा घेण्यासाठी असते समाजात ब्राह्मण एक नंबर असून ते त्यांना मान्य आहेत दुसऱ्या नंबर ची जागा मिळवी म्हणून आपसातच भांडण्यासाठी बुद्धीच्या वापर केला जातो माणसात माणूस म्हणून जगण्याची समतेने वागण्याची बंधुभाव निर्माण करण्याची करुणा व्यक्त करण्याची ही जी जीवन पद्धती आहे त्यावर विचार करून जे समाजात वाईट आहे जे समाजाला एका भावाला दुसऱ्या भावापासून तोडते त्या व्यवस्थेवर विचार करणे आवश्यक आहे आपल्या लोकांच्या भल्याकरिता ज्या योजना आहे त्या योजनेला विरोध करणारा कोणता वर्ग आहे याची जाणीव होणे अत्यंत आवश्यक आहे. बहुजन समाज हा गरिबीत अज्ञानात अंधश्रद्धेत पूर्ण बुडाला आहे त्याला बाहेर काढणे आवश्यक आहे व त्यासाठी ज्यांनी व्यवस्था निर्माण केली आहे त्या व्यवस्थेची चिकित्सा होणे अत्यंत आवश्यक आहे कारण इतिहास माहित नसेल तर भविष्य घडविता येत नाही या करिता व्यवस्थेची चिरफाड होणे अत्यंत आवश्यक आहे आपली अस्मिता जागृत करून या व्यवस्थेविरुद्ध लढण्यास सजग व्हावे! ■■

## आंबेडकरी चळवळीचे समर्पित कार्यकर्ते -राजरतन मोटघरे

**बहुजन नायक मा. कांशीरामजी यांचे सहकारी, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे जेष्ठ नेते, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणारे राजरतन मोटघरे यांचे वयाच्या 65 व्या वर्षी 5 सप्टेंबर ला दुःखद निधन झाल्याची वार्ता कळली आणि धक्काच बसला. मन शोक सागरात बुडाले. 30-35 वर्षाचा सहप्रवासी मित्र राजरतन मोटघरे यांचा जीवन संघर्ष, जीवन प्रवास आठवू लागला. ते चित्र डोळ्या समोर सारखे येऊ लागले.**



राजरतन मोटघरे यांचा जन्म नागपूर जिल्हयातील भीवापूर तालुक्यातील पांजरेपार या गावी 20 डिसेंबर 1958 ला झाला. त्यांचे बाबा आणि मोठेवडील नौकरीनिमित्त डिफेन्स ऑर्डनन्स फॅक्ट्री, जवाहर नगर, भंडारा येथे आले.

राजरतन मोटघरे यांचे शालेय शिक्षण ऑर्डनन्स फॅक्ट्रीच्या जवाहरनगर (भंडारा जिल्हा) येथील सेन्ट्रल स्कूल ला झाले तर महाविद्यालयीन शिक्षण शासकीय महाविद्यालयात नागपूर येथे झाले. त्यांनी या महाविद्यालयातून बीएफए (बॅचलर ऑफ फाईन आर्ट) ही पदवी प्राप्त केली आणि येथूनच त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. त्यांना दीनानाथ हायस्कुल, नागपूर येथे कलाशिक्षक म्हणून नोकरी मिळाली. त्यांचे उत्कृष्ट ड्राईंग, सुबक अक्षरे, मृदू स्वभाव आणि माणसं जोडण्याची कला यामुळे ते विद्यार्थ्यांत विद्यार्थी प्रिय होते. यातूनच त्यांचा सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक वावर सुरू झाला. 1980 च्या दशकात त्यांचा बहुजन नायक मा. कांशीरामजी यांचेशी संपर्क आला आणि कलागुणाचे पारखी असलेले मा. कांशीरामजी यांनी पेन्टिंग स्कॅडमध्ये सक्रिय केले. 1981 ला मा. कांशीरामजी यांनी डीएसफोर ची स्थापना केली आणि त्याच वर्षी जम्मु कश्मीर ची विधानसभा निवडणूक लागली. त्या निवडणुकीच्या प्रचारार्थ पेन्टिंगसाठी मा. कांशीरामजी यांनी त्यांना जम्मू-कश्मीरला पाठवले आणि त्यांचा बामसेफ, डीएसफोर, बीएसपीच्या कार्यक्रमाच्या बॅनर, पेन्टींग पासून, वॉलपेन्टिंग्स राजरतन मोटघरे यांच्या हस्ताक्षरात भारतभर भींती बोलक्या झाल्या आणि फुले-आंबेडकरी चळवळीला गती देण्यात राजरतन मोटघरे यांचा सहभाग वाढत गेला.

**रमेश पाटील**
**9960683531**

बहुजन समाज पार्टीचे श्रीकृष्ण उबाळे हे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असतांना राजरतन मोटघरे प्रदेश महासचिव होते. त्यांनी मा. कांशीरामजी यांचे आदेशानुसार उत्तर नागपूर विधानसभा निवडणूक लढवली. भारतीय राजकारणाला कलाटणी देणारी 1988 ला अलाहाबाद लोकसभा पोटनिवडणूकीत मा. कांशीरामजी स्वतः उमेदवार म्हणून रिंगणात उतरले आणि देशभरातील बीएसपी नेते, पेंटिंग सक्कॅड कार्यकर्ते अलाहाबाद निवडणुकीच्या प्रचारात उतरले. राजरतन मोटघरे यांच्या सोबत अनेकांसह मीही सहभागी होतो. अलाहाबाद पोटनिवडणूक गाजली जी पेंटिंगमुळे पूर्ण अलाहाबाद लोकसभा मतदारसंघा मधल्या भींती हत्ती चिन्हाने निळ्या झाल्या होत्या त्यात मोटघरे सरांच्या कुचला अनेक भिंतीवर चालला.

बहुजन नायक मा. कांशीरामजींच्या निर्वाणानंतर कांशीरामजी प्रणीत फुले-आंबेडकरी चळवळीत प्रचंड उलथापालथ झाली. गरजेपोटी मा. कांशीरामजींचे वैचारिक वारस व निष्ठावंत सहकारी चळवळीतील सहभागी ॲड. डॉ. सुरेश माने यांनी लोकग्रहास्तव बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीची स्थापना 9 ऑक्टोबर 2015 ला नागपूर येथे केली. बीआरएसपी स्थापनेपासूनच मा. राजरतन मोटघरे सक्रिय राहिले.

2016 ला ते दिनानाथ हायस्कूल, धंतोली नागपूर येथून सेवानिवृत्त झाले आणि कौटुंबिक घडी स्थिरसावार करीत असतानांच त्यांना आजाराने घेरले आणि आज 5 सप्टेंबर रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. राजरतन मोटघरे यांच्या पश्चात पत्नी पौणिमा पोटघरे, मुलगी श्रुती मोटघरे, मुलगा संघर्ष, सुन, नातू आणि बराच मोठा आप्त परिवार आहे. स्मृतीशेष राजरतन मोटघरे यांनी उभी हयात आंबेडकरी चळवळीत सक्रिय राजकारणात कार्यकर्ते अर्पण केली आहे. ■■

## वाचकांचा अभिप्राय

बहुजन सौरभ

### श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक

मूळ श्रद्धा आहे म्हणूनच विरोधार्थी शब्द अंधश्रद्धा आहे. त्यासाठी श्रद्धा व अंधश्रद्धा यातील मुख्य फरक जाणून घ्यायला पाहिजे. श्रद्धा म्हणजे विचारपूर्वक आणि विचारोत्तर एखाद्या गोष्टीवर आदरयुक्त विश्वास ठेवणे म्हणजे श्रद्धा आणि विचार न करता एखाद्या गोष्टीला आदर व विश्वासास पात्र ठरवणे म्हणजे अंधश्रद्धा होय. आपल्या आईवडिलांवर असते ती श्रद्धा. कारण त्यांनी आपले पालनपोषण केलेले असते, आपल्यासाठी स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन आपल्याला वाढवले असते. ही विचारनिष्ठा त्यांच्यातच असते म्हणुन ती श्रद्धा व विचार न करता कुठल्याही गोष्टीवर अगदी डोळे झाकुन विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा होय. असाच समज समाजात रुढ आहे. चमत्कारावर विश्वास हे अंधश्रद्धेचे मुळ कारण आहे. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या भजनात म्हणतात 'भुलू नका हो चमत्कारा, जगी ही थापच सारी!' चमत्कार म्हणजे निव्वळ थाप होय. म्हणून चमत्कारावर विश्वास ठेऊ नका. हेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुख्य ध्येय आहे.

'श्रद्धावान् लभते ज्ञानम् । अंधश्रद्धा विनाशाय।' याचाच अर्थ असा की श्रद्धाळु लोक हे ज्ञानप्राप्ती करतात व अंधश्रद्धेवर विसंबून राहणारे विनाशाकडे जातात. मानहानी, जनहानी, आर्थिक हानी असंच काहीसं!

ज्यांना आपण देव, आदर्श मानतो त्यांना मनापासून शरण गेल्याने त्यांचे आनंदी, कार्यप्रवण, समाधानी, तृप्त, उद्यमशील आणि शुभस्थिर अस्तित्व तुमच्याकडे चिरकाल राहते ही 'श्रद्धा' होय. देवाची भक्ती करताना केवळ श्रद्धा, निष्ठा, विश्वास, समर्पण असून चालत नाही. जोडीने संयमही तेवढाच महत्वाचा, देवाच्या कृपेची वेळ ठरलेली असते. पण त्या वेळेची वाट पाहण्याचा संयम हा आपल्यात हवाच. त्याऊलट अंधश्रद्धा असते त्यात श्रद्धा, निष्ठा, समर्पण वगैरे काहीच लागत नाही, संयम तर मुळीच नाही. 'चट मंगनी पट ब्याह'. हाथी लागते ती निराशा, नुकसान, वैफल्य व विनाश. यालाच अंधश्रद्धा म्हणू! व त्या स्थितीतून सावरायला पुन्हा श्रद्धेचीच जोड लागते हा मुख्य फरक जाणून घ्यायला हवा.

**- आनंद कोहाड**

## शासन आणि शिक्षण

*ज्या देशाची शिक्षणव्यवस्था मजबूत असेल तोच देश प्रगत आणि विकसित असतो. त्यामुळे शासनाने अधिकाधिक शिक्षणक्षेत्राकडे लक्ष देणे अगत्याच आहे. आपल्या आम बजेटमध्ये शिक्षणक्षेत्रासाठी भरीव तरतुद करणे अतिशय महत्वाच आहे. जपान तथा युरोपियन विकसित देशांचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की ते त्यांच्या आम बजेटचा 20 ते 30 टक्के वाटा शिक्षण क्षेत्रावर खर्च करतात हेच खरे कारण ते देश विकसित आणि प्रगत असण्याचे आहे. मात्र आपल्या देशाच चित्र अतिशय धक्कादायक आहे.*



आम बजेटच्या फक्त 2 ते 3 टक्के तरतुद शिक्षण क्षेत्रासाठी असते. त्यामुळेच भारताची शिक्षण व्यवस्था पूर्णतः ढासळलेली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेची विदारक परिस्थिती बघता भारतीय शासनकर्ते जनतेवर राज्य करण्यासाठी जो निसर्ग नियम आहे त्यासाठीच प्रयत्न करत आहे की काय असे वाटते, तो नियम म्हणजे 'जी जनता दरिद्री व अशिक्षित असेल तिच्यावरच राज्य करता येते' यासाठीच तर शिक्षण व्यवस्थेची राज्यकर्त्यांनी वाट लावली की काय अशी शंका येते. शिक्षकांच्या हजारो जागा रिक्त असतांना भरती नाही, जे शिक्षक आहे त्यांना शाळाबाह्य इतर कामात गुंतवून त्यांना शिकवू देत नाही. खासगी शाळांना उत्तेजन देवून सरकारी शाळा मोडीत काढण्याचे धोरण अवलंबील्या जात आहे. शिक्षणाप्रती शासनाची ही उदासीनता बघता भारताचं भवितव्य अंधारमय असल्याच जाणवते. सर्वांना मोफत आणि दर्जेदार शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. ती योग्यपणे निभविल्यास खऱ्या अर्थाने महात्मा फुले सावित्रीमाईने या देशात शिक्षणाची पेटविलेली ही मशाल प्रज्वलीत होवून विश्वात भारत प्रकाशमान होईल यात शंका नाही.

### शिक्षक आणि शिक्षण

शिक्षकच खऱ्या अर्थाने समाजाला योग्य दिशा देण्याच कार्य करीत असतो त्यामुळे भारताचे महासत्ता होण्याच स्वप्न शिक्षकच पूर्ण करु शकते, त्यासाठी विवेकशील विज्ञानवादी पिढी तयार करणे आवश्यक आहे तरच हे स्वप्न पूर्ण होवू शकते, हे कार्य शिक्षकाच्याच हातून घडू शकते. हे कोणीही नाकारु शकत नाही. त्यासाठी शिक्षकी पेशात येणाऱ्यांनी नोकरी म्हणून नव्हे तर समर्पन म्हणून येणाराच या पेशाला न्याय देवू शकते. शिक्षक हा सदैव विद्यार्थी असावा लागतो. त्याला नेहमी ज्ञानाची भुक असावी लागते. आपलं नॉलेज सदैव अपडेट ठेवणारा असावा. इतर देशांमध्ये शिक्षकांचा पगार सर्वात जास्त असतो याच कारण त्यानी पन्नास टक्के रक्कम आपलं ज्ञान वाढविण्यासाठी खर्च करने व पन्नास टक्के रक्कम उपजीविकेसाठी खर्च करने बंधनकारक असते. त्यामुळे अध्यापनाच्या व्यतिरीक्त मिळणारा वेळ हा तेथील शिक्षक अभ्यासात ज्ञानार्जनात वाचनात ग्रंथालयात घालवतांना आपल्याला बघायला मिळतात त्यामुळे इतर देशातील शिक्षकांचा दर्जा उच्च कोटीचा असल्याचे दिसून येते. याउलट भारतीय शिक्षक त्यांचा संपूर्ण पगार हा स्वतःच्या उपजीविकेसाठी प्रपंचासाठीच खर्च करतांना दिसते, त्यातून एक पुस्तक खरेदी करतात की नाही अशी स्थिती आहे. आपल्या देशात ज्ञानवृद्धीसाठी खर्च करणारे शिक्षक नगन्य आहे. आपण भारतीय शिक्षक अध्यापनाव्यतिरीक्तचा वेळ हा ज्ञानार्जनासाठी फारच अल्पसा व्यतीत करतो. आपल्या बऱ्याच शिक्षकांचा हा वेळ अन्य जोड व्यवसायात खर्च होतांना दिसते. अशा शिक्षकांकडून गुणवत्तेची अपेक्षा करणे म्हणजे भ्रमनिराशच. यावरही प्रत्येक शिक्षकाने आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे.

**रामचंद्र सालेकर**
**9527139876**

### पालक आणि शिक्षण

प्रत्येक पालक आपल्या मुलासाठी मोठ-मोठी स्वप्न बघत असतो. आपल्या मुलाने खुप प्रगती करावी, आपल्यापेक्षा खुप काही बणावं ही त्याची अपेक्षा असते परंतु अपेक्षा करतांना भारतीय पालक शाळा शिक्षक शासन यांच्यावर सगळी जबाबदारी देवून मोकळा होतो. तो स्वतः मुलाला वेळ देत नाही, वेळ दिला ही तरी तो त्याच्यावर शैक्षणिक मार्गदर्शन करण्यास सक्षम नसतो. इतर विकसित देशातील पालक हे आत्मनिर्भर असते ते आपल्या पाल्यासाठी स्वतः सर्व भूमिका पार पाडतात. विद्यार्थी हा चोवीस तासापैकी अठरा तास पालकाच्या सानिध्यात असतो. फक्त सहा तास हा शाळा शिक्षकांच्या सानिध्यात असतो. तेव्हा मुलांच्या शिक्षणासाठी पालकांची भूमिका सर्वात जास्त महत्वाची आहे.

### विद्यार्थी आणि शिक्षण

मातीच्या गोळ्याला जसा आकार देवू तशी ती माती आकार घेते. विद्यार्थ्यांचही तसचं आहे, त्याला कसा आकार द्यायचा ते शिक्षक पालक समाज व शिक्षानिती तयार करणारं शासन यांचेवर निर्भर आहे. मुल्यशिक्षण त्याचबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणारं शिक्षण आदर्श नागरिक घडवू शकते. प्रत्येक विद्यार्थ्यांनी वेळ व अभ्यासाचे नियोजन याचा मेळ घालून जिद्द आणि चिकाटी हे गुण अंगीकारुन प्रयत्न केल्यास हमखास यश येणार हे लक्षात घ्यावे.

### प्रसारमाध्यम आणि शिक्षण

शासनाला शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासक्रम निश्चीतीत दिशानिर्देश देणे, देशाच्या धर्मनिरपेक्षतेला एकात्मतेला व बंधुभावाला बाधा येईल अशा अभ्यासक्रमातील घटकावर आक्षेप नोंदवून शासनाच्या निदर्शनास आणून समाजजागृती करने. अभ्यासक्रमातून वैज्ञानिक दृष्टीकोन, अंधश्रद्धानिर्मुलन या मुल्याच्या जपनुकीसाठी पाठ्यक्रम मंडळावर नियंत्रण ठेवणे त्याच प्रमाणे शिक्षणक्षेत्रावर जास्तीत जास्त आम बजेटमध्ये तरतुदीसाठी आग्रही असने आदींसाठी प्रसारमाध्यमांद्वारा शासनाला वेळोवेळी बाध्य केले पाहिजे. हल्ली समाजात आध्यात्मीकतेच्या नावावर तथाकथित गुरुंचे प्रमाण फार वाढले असून समाजाला दैववादाकडे लोटण्याचे काम मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रानीक मीडियाद्वारा सूरु आहे. दैववाद हा मानसाच्या प्रगतीतला फार मोठा अडसर असून कर्मवादच विद्यार्थ्यांचं भविष्य घडवू शकते, तेव्हा प्रत्येक विद्यार्थाने कर्मवादीच बणले पाहिजे. आपले बळीराजापासून ते गौतम बुद्ध, शिवाजी महाराज ते शाहू, फुले, आंबेडकर हे महापुरुष आणि संत तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज... आपले आईवडील व शिक्षक हेच आपले खरे गुरु आहे, शिष्याचा अंगठा मागणाऱ्या गुरुंपासुन समाजाला सावध करण्यासाठी प्रसारमाध्यमांनी आपली भूमिका पार पाडावी. तरच खऱ्या अर्थाने शिक्षकदिन हा भारताचा गौरव दिन होईल. ■■

# दृष्टी महिला बहुउद्देशीय संस्थेमार्फत धम्म परिषदेचे आयोजन





**नागपूर :** दृष्टी महिला बहुउद्देशीय संस्थेमार्फत मंत्रा सेलिब्रेशन, बेसा येथील सभागृहामध्ये धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्म परिषदेचे उद्घाटन प्रादेशिक उपायुक्त, सामाजिक न्याय विभाग डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी हृदयरोग तज्ज्ञ डॉ. राम घोडेस्वार सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त रेखा भवरे, दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक प्राचार्य संध्या राजुरकर, धम्मचारी आर्य कीर्ती धम्मचारी दीप रत्ना, ज्येष्ठ समाज सेवक राम घोडेस्वार, पेटकर, श्रीराम बनसोड व इतर मान्यवर उपस्थित होते. धम्म परिषदेच्यानिमित्ताने अनेक मान्यवरांनी विविध विचार व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी बौद्ध धम्माचे महत्त्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधारा व विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून जगायचे असेल तर बौद्ध धम्मा शिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन केले.
प्रत्येकाने धम्म समजून घेतला तर कदाचित हा जातीभेदसुद्धा नष्ट होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे मंडल आयोग सारखे कायदे व त्याअंतर्गत तरतुदी यांचा अभ्यास प्रत्येक समाजाने व्यवस्थित केल्यास समाजामधील गैरसमज दूर होतील. राष्ट्रीय पारिवारिक धम्म संगोष्टीचे महासचिव धर्मेश प्रसेनजीत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातून बौद्ध धम्म नष्ट होण्याचे एक कारण बौद्ध संस्कृतीचे जतन होणे. त्याकरता प्रत्येक बौद्ध कुटुंबातील व्यक्तीला बौद्धाचे संस्कार, सण, शिष्टाचार,

> “ यांनी सध्याच्या युगामध्ये धम्माचे अष्टांगिक मार्गाचे पालन केल्यास आपल्या समाज निश्चितपणे सुधारेल अशी आशा व्यक्त केली.
> - डॉ. राम घोडेस्वार, सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ञ

बौध्दानी काय करावे काय? करू नये? याची इत्थंभूत माहिती असणे आवश्यक आहे. यावेळी रेखा भवरे, धम्मचारी आर्य कीर्ती, धम्मचारी दीपरत्ना, पेटकर व बनसोड यांनी सुद्धा आजच्या युगामध्ये धम्माचे पालन करणे व त्याप्रमाणे आचरण करणे का आवश्यक आहे याविषयी आपले मत व्यक्त केले. या धम्म परिषदेचे आयोजन दृष्टी महिला बहुउद्देशीय संस्था च्या अध्यक्षा संगीता अरुणराव चव्हाण व सचिव सरिता पाटील यांनी केलेले होते. दृष्टी महिला बहुउद्देशीय संस्था रेवतीनगर बेसा, नागपूर या संस्थेने यापूर्वी संविधान दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम आणि समाजात मोबाईल वापरामुळे उत्पन्न झालेल्या समस्या आणि त्याचे निराकरण यावरसुद्धा ग्रामीण क्षेत्रातील महिला व मुलांसाठी कार्यक्रम कार्यशाळा आयोजित केले होते. संस्थेच्या अध्यक्षा संगीता चव्हाण यांनी संस्थेच्या इतर कामकाजाबाबत माहिती दिली.
यावेळी कार्यक्रमाचे संचालन जयश्री गणवीर व सुवर्णा डोंगरे यांनी केले.

> आंबेडकरवादी जनतेने धम्माचा प्रचार करणे आवश्यक आहे, तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजामधील विषमता दूर करण्यासाठी निर्माण केलेले संविधान आणि त्यामधील तरतुदी प्रत्येकाने समजून घेतल्यास समाजामध्ये समता वाढेल आणि धम्माचे निश्चितपणे पालन होईल.
> प्रा. संध्या राजुरकर, निवासी संपादक, दै. बहुजन सौरभ

यशस्वीतेकरिता वेगवेगळ्या भागातून अनेक लोकांचे सहकार्य लाभले, संगीता म्हैसकर, सरदार ताई, प्रमोद मून, सुजाता वासनिक, नीतू गोंडाने, अर्चना चंदनखेडे, वैशाली गोडबोले, आशा तामगाडगे, शीला ताकसांडे, बनसोडे, सरोदे, विभा मेश्राम, रायभान पाटील, अशा अनेक लोकांच्या सहभागातून ही परिषद यशस्वी झाली.

# भारतातील बहुजनांना म. फुले यांचे सत्यशोधकीय विचार स्वीकारल्याशिवाय मुक्ती नाही : नागेश चौधरी



**नागपूर :** भारतातील बहुजनांना म. फुले यांचे सत्यशोधकीय विचार स्वीकारल्याशिवाय मुक्ती नाही, असे मत नागेश चौधरी यांनी व्यक्त केले. म. बसवेश्वर पुतळा परिसरातील दत्तात्रयनगर स्थित शिवाजी सभातृहात आयोजित 'सत्यशोधक विचार' या विषयावर मांडणी करीत होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. दिवाकर वर्षे होते. आयोजन सत्यशोधक प्रबोधिनी, बहुजन संघर्ष समिती, राष्ट्रीय ओबीसी महासंघ व नवउन्मेषण साहित्य सभा या चार संघटनांच्या वतीने संयुक्तपणे करण्यात आले होते. यावेळी 'लोकशाहीचे आद्य प्रवर्तक म. बसवेश्वर' या विषयावर सुधा बामनपल्लीवार यांनी विचार व्यक्त केले. म.अंनिसचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकरराव धंदरे यांनी 'अंधश्रध्दा निर्मूलनाची गरज' या विषयावर मांडणी केली. 'भारतीय संविधानाचे ओबीसींसाठी महत्व' या विषयावर प्रा. शरद वानखेडे यांनी मांडणी करीत संविधान वाचून ओबीसींनी आपले संवैधानिक हक्क जाणून घेण्याचे आवाहन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात दिवाकर वर्षे यांनी 'बहुजन राष्ट्र' या संकल्पनेवर मांडणी करीत सर्वांच्या भाषणांचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद उलीपवार यांनी मांडले व संचालनही त्यांनीच केले. आभार दिवाकर शिर्के यांनी मानले. कार्यक्रमात मराठा मार्ग मासिकाचे संपादक व ज्येष्ठ पत्रकार प्रभाकरराव कोंडबत्तुनवार, दै. बहुजन सौरभच्या निवासी संपादिका संध्याताई राजुरकर, पुष्पा चौधरी, कुमूद वर्षे, कल्पना मून, विलास गजभिये, शकिल पटेल, प्रमोद मून, गोविंद वरवाडे, अ. सलाम, शेषराव दळली, राजू बामनपल्लीवार, संजय बामनपल्लीवार, प्रा. प्रमोद मुलकलवार, बाबा बिडकर, गणेश नाखले, हेमंत गावंडे, आनंद कोहाड, अमरदिप शामकुवर, मानसी उलीपवार, नीता ठाकरे, विणा उलीपवार, किरण सेलुकर, प्रदिप मेडपिलवार, विजय मोगलेवार, मनिषा मुलकलवार, प्रियंका ठाकरे व यशवंत जांभूलकर आदि उपस्थित होते.

> सद्या भारतातील सर्वच क्षेत्रात व सवैधानिक संस्थांवर ब्राम्हणांनी जबर सत्ता काबिज केली आहे. या विरोधात बहुजनांना मुक्ती पाहिजे असल्यास त्यांनी म. फुले यांचे सत्यशोधकीय विचार अंगीकारणे व त्याप्रमाणे कृतीकार्यक्रम राबविणे, हाच एक पर्याय शिल्लक आहे. असे केले नाही तर भारत देशात मनुस्मृतीकृत अदृश्य व काळोखी व्यवस्था लागू होईल व मुक्तीचे सर्व मार्ग बहुजनांसाठी बंद असतील. तसेच 2024 मध्ये सद्या सत्तेत असलेले ब्राम्हण ही सत्ता सोडतील, असा जर बहुजनांचा भ्रम असेल तर तो त्यांनी त्वरित झटकून टाकावा. उलट ही सत्ता ते प्रखरपणे कसतील आणि बहुजनांचे जगणे मुश्किल करतील.
> - नागेश चौधरी, संपादक, बहुजन संघर्ष

## महत्वाचे

### यंग टीचर्स असोसिएशनतर्फे डॉ. संजय ढोबळे यांचा सत्कार



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे यांना स्टॅनलोड विद्यापीठाच्या टॉप दोन टक्के शास्त्रज्ञाच्या यादीत स्थान मिळाल्याबद्दल संघटनेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संघटनेतर्फे डॉ. भारत मेघे, डॉ. विनोद गावंडे, डॉ. राजीव गोसावी, डॉ. किरण नेरकर, डॉ. संजय चौधरी, डॉ. किशोर घोरमाडे, डॉ. शरद डवरे यांची उपस्थिती होती.

### जयदीप कवाडे यांच्या आक्रमक भूमिकेला यश




**बुलढाणा :** बुलढाणा जिल्हात्तील कोलासार या गावी जातियावादी लोकांनी गावात लावलेला निळा झेंडा तहसीलदारच्या मदतीने काढून टाकला. अशी माहिती मिळताच पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी आक्रमक भूमिका घेत बुलढाणा जिल्हात्तील कोलासार या गावी भेट दिली. तहसीलदार व कलेक्टरला धारेवर धरुन लगेच आमच्या मागणी मान्य करा अशी आक्रमक भूमिका घेऊन प्रशासनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेचा निळा झेंडा परत लावण्याचे कलेक्टर यांनी लगेच आदेश दिले.

### राष्ट्रीय कॉन्ट्रॅक्टर कामगार संघ जोडो अभियान



**नागपूर :** राष्ट्रीय संपर्क मजदूर संघ जोडो अभियानांतर्गत नुकत्याच झालेल्या 4 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 वाजता राष्ट्रीय अध्यक्ष विजय पटले व उपाध्यक्ष टेकचंद रहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली असून उत्तर नागपूर नवीन कार्यालय कबीरनगर चौक, कांच कंपनी जवळ, पॉवर गेट चौक सुगतनगर नागपूर येथे जास्तीत जास्त कंत्राटदार, कामगार बांधव व सर्व युनियनचे पदाधिकारी या सभेत सहभागी होऊन सर्वांनी आपला जल्लोष दाखविला व या युनियनच्या माध्यमातून युनियन पूर्णपणे सहयोग भरभरून देणार आहे. कंत्राटदार, दुकानदार, मजूर यांना पाठीशी घालून आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहून पोहोचविण्याचे काम करणार आणि अनेक लोकांच्या तक्रारी होत्या, अधिकाधिक लोकांनी या युनियनमध्ये सामील व्हावे, आमचे ध्येय पूर्ण होईल, असे युनियनचे म्हणणे आहे.

# संविधानातील सामाजिक न्याय उपेक्षितांपर्यंत पोहचला पाहिजे : ई.झेड. खोब्रागडे




**पुणे :** भारतीय संविधानाने या देशातील प्रत्येक नागरिकांना न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता प्रदान केली आहे. सर्व नागरिकांच्या विकासासोबतच वंचित, उपेक्षित असलेल्या मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी संविधानात विशेष तरतूद केली आहे. मात्र संविधानातील हा सामाजिक न्याय अजून उपेक्षित वंचित घटकांच्या पर्यंत पोहचला नाही त्यामुळे नागपूर येथील मांग गारुडी समाजाच्या रहाटेनगर सारख्या अनेक वस्त्या आज ही मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित असल्याचे मत संविधान फाऊंडेशन संस्थापक सेवानिवृत्त सनदी अधिकारी ई. झेड. खोब्रागडे यांनी बार्टीच्या ऑनलाईन बैठकीत बोलतांना व्यक्त केले.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेने नागपूर येथील रहाटे नगर येथील मांग गारुडी समाजाच्या विविध प्रश्नांसंबंधी दिनांक 1 सप्टेंबर 2023 रोजी आयोजित केलेल्या ऑनलाईन बैठकीत खोब्रागडे बोलत होते.
बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत खोब्रागडे पुढे म्हणाले की, 'बार्टी संस्थेने रहाटेनगर, नागपूर येथील मांग गारुडी समाजाचे सर्वेक्षण करून जो अहवाल बनविला आहे तो प्रशंसनिय आहे. यासाठी बार्टीचे त्यांनी अभिनंदन केले. शासनाने या वस्तीत आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, जमिनीचे मालकी हक्क, घरकुल योजना, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात यासाठी बार्टी संस्थेने पुढाकार घेऊन सामाजिक न्यायाचे तत्व अंमलात आणावे. बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या संकल्पनेतून बार्टी कार्यालयात दररोज सकाळी संविधान उद्देशिका सामूहिकपणे वाचनाचा उपक्रम सुरु केल्याबद्दल त्यांनी या उपक्रमाचे स्वागत करुन महासंचालक सुनील वारे यांचे हार्दिक अभिनंदन केले.
या बैठकीच्या समारोपात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्यावर संशोधन करून नव्या पिढीपर्यंत हा वारसा नेण्यासाठी बार्टी कटीबद्ध असल्याचे सांगितले बार्टीच्या विविध योजनांचा लाभ घेऊन उच्च पदस्थ झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे स्नेमिलन आयोजित करण्यात येईल. तसेच संविधान कक्षाच्या माध्यमातून बार्टी 'हर घर संविधान' हा उपक्रम सुरु करत असल्याची माहिती त्यांनी दिली.
या बैठकीला रहाटेनगर, नागपूरमध्ये सामाजिक कार्य करणारे प्रमोद काळबांडे, खुशाल ढाक हे ऑनलाईन उपस्थित होते. तर बार्टी मुख्यालयात विभाग प्रमुख स्नेहल भोसले, अनिल कारंडे, वृषाली शिंदे, निबंधक इंदिरा अस्वार, सतीश पाटील, संशोधन विभागाचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ. प्रेम हनवते, संविधान कक्षाचे सुमेध थोरात, नागपूर तेथील बार्टी उपकेंद्राचे प्रकल्प अधिकारी शितल गडलिंग, तुषार सूर्यवंशी इत्यादी उपस्थित होते.




# युनियन बँक ऑफ इंडियातर्फे 'यू जीनियस' सामान्य ज्ञान स्पर्धा

**नागपूर :** युनियन बँक ऑफ इंडियातर्फे विदर्भातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी 'यू जीनियस' सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत एकूण 200 शाळांमधील 800 विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवली. स्पर्धेत सोमलवार निकालस खामला शाळेचा संघ विजेता ठरला. विजेत्या संघाला ट्राफी आणि शाळेची रोलिंग ट्राफी देऊनगौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण उपसंचालक उल्हास नारद तर विशेष अतिथी म्हणून पुणे विभागाचे महाव्यवस्थापक नवीन जैन हे होते. स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे उल्हास नारद, शिक्षण उपसंचालक, युनियन बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकारी नवीन जैन, मयंक भारद्वाज, एम. व्ही. एन. रविशंकर, अनूप तराळे, राजेश यादव, प्रमोद ठाकूर, एस. शिवकुमारन, सुभाष गजभिये, डॉ. बर्टी ऍशले आदी उपस्थित होते. भवन्स बी. पी. विद्यामंदिर सिव्हिलमधून. यशस्वी साबू, मधुरा दाणी सेंटर पॉईंट स्कूल -2 काटोल रोड येथील अमी परिहार, अनन्या बेहेती, नारायणा विद्यालयातील श्लोक लोणारकर, अर्णव शिंदे, सरस्वती विद्यालय शंकरनगर येथील रेणुकादेवी चुनोडकर, किरीट लोखंडे, अकोला येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स या शाळेच्या विद्यार्थ्यांनी, सोमलवारकडून वेदांत मुंढे आणि कुशल पोफळी यांनी सहभाग घेतला. सर्व संघांमधील स्पर्धा अतिशय रंजक झाली. शेवटच्या फेरीत सोमलवार निकालस, खामला संघाने प्रतिस्पर्धी सेंटर पॉइंट स्कूल-2 काटोल रोड या संघाला 50 गुणांच्या फरकाने पराभूत करून सोमलवार निकालस खामला शाळेचा संघ विजेता ठरला.

# एक परिवार एक पुष्पहार या अभियानाअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**नागपूर :** पुज्य भदन्त हर्षबोधी बौधगया यांच्या संकल्पनेतून दररोज सकाळी 8.30 वाजता संविधान चौकात परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करण्यात येते. प्रमुख अतीथी म्हणुन जी.डी. जांभुळकर, माजी सदस्य महाराष्ट्र पब्लिक सर्विस कमीशन यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. डब्ल्यू. पी. नगराळे, एल. टी. लवात्रे, माजी उपमहाप्रबंधक वेस्टर्न कोलफील्ड लीमीटेड प्रामुख्याने उपस्थित होते. राजेश पाटील यांची विशेष उपस्थिती होती.
सर्वप्रथम ज्योती बेले यांनी प्रास्ताविक करतांना 365 दिवस यापमाणे डॉ. बाबासाहेबांच्या प्रतीमेला रोजचं पुष्पहार अर्पन करण्यात येते. नंतर कार्यक्रमाचा उद्देश व कार्याचे सविस्तर वर्णण उपस्थितांना करुन दिले. संविधान उद्देशिकेचे वाचन सोमकुवर यांनी केले.
याप्रसंगी प्रमुख अतिथी डी. जी. जांभुळकर म्हणाले की जोपर्यत आपल्यात दुफळी झालेल्या संघटना एकत्रीत येवून कार्य करीत नाही व एकोप्याची जाणीव होत नाही तोपर्यत आपला निभाव हया सध्याच्या राजकारणात लागणार नाही. समता, बंधुता आणी एकता या बाबासाहेबांच्या तत्वाला आपण तिलांजली देत आहोत. याची प्रत्येकाने जाणीव ठेवायला हवी. कार्यक्रमाचे अध्यक्षा तरुलता कांबळे यांनी केले. डब्लू. पी. नगरारे, एल. टी. लवात्रे, राजेश पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रमिला टेंभेकर यांनी संचालन केले. वर्षा सवाईथुल यांनी आभार मानले. या प्रसंगी त्रीवेणी पाटील, दमयंती रामटेके, अरुणा धोपटे, मनीषा भगत, ज्योती मेंढे, पौनीपगार, सोमंकुवर. बोदांटे, रेखा पाटील आणी उपासक-उपासिका तसेच नागरिक उपस्थित होते.

# रंगीला सावन क्वीन प्राईड क्लबतर्फे स्पर्धा



**नागपूर :** दरवर्षी प्रमाणे नुकतेच रंगीला सावन क्वीन प्राईड क्लब तर्फे स्पर्धात्मक कार्यक्रम शहरातील तसेच चंद्रपूर, वणी, वरोरा, वर्धातील कुमारीकांना आमंत्रित करण्यात आले. त्यांच्या ताजेतवाने आणि आल्हाददायक जीवनासाठी त्यांच्या कुटुंबातील फापटपसारा आवरुन व शिक्षणाची गोडी कायम ठेवून आयुष्याची गाडी झुकझुक न चालता पूर्ण स्पीडने चौफेर रंग उधळीत रंगीला सावन क्वीन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात वेषभूषा, कॅटवाक आणि आयक्यु टेस्ट स्पर्धा प्रामुख्याने घेण्यात आली. या स्पर्धेत नागपूची प्रतीक्षा राजेश पाटीलला कॅटवाक आणि आयक्युमध्ये सेकंड रनरअप म्हणून गौरवांकित करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिध्द डॉ. रिचा जैन, निर्देशक सरीता ओसवाल प्राईड क्लब नागपूर तसेच परिणीती फुके माजी नगरसेवक या परीक्षण समीतीतर्फे निवड करण्यात आली. हा कार्यक्रम साई वाटिका शंकरनगर नागपूर इथे आयोजित करण्यात आला. प्रतीक्षा राजेश पाटील हिने कॅटवाक आणी आयक्युटेस्टमध्ये फर्स्ट रनरअप जिंकला आणि पुढील स्पर्धेसाठी तिला मुंबईला आमंत्रित करण्यात आले. प्रतीक्षा ही त्रिवेणी राजेश पाटील, 365 दिवस, एक परिवार एक पुष्पहार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संस्थेची संयोजक यांची मुलगी आहे. वरील कार्यक्रमात भरगच्छ गर्दीने साई वाटीका अगदी फुलून गेला होता. प्रतीक्षा राजेश पाटील हिला पुढिल स्पर्धेकरिता शुभेच्छा.

## निधन वार्ता

### राजरतन मोटघरे



**नागपूर :** बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे प्रथम माजी महासचिव, उत्कृष्ट पेंटर व दीनानाथ हायस्कूल येथील निवृत्त चित्रकला शिक्षक राजरतन वामनराव मोटघरे वय 65 वर्षे यांचे आजाराने निधन झाले. दि 5 सप्टेंबर रोजी दुपारी 4 वाजता त्यांची अंत्ययात्रा लष्करीबाग येथील त्यांच्या निवासस्थानाहून निघून वैशालीनगर बारसे घाट येथे अंत्यसंस्कार पार पडले.

# बौद्ध तरुणांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**नागपूर :** अहमदनगर तालुक्यातील श्रीरामपूर येथील हरेगाव या ठिकाणी चार बौद्ध तरुणांवर झालेल्या अपमानास्पद मारहाण करणाऱ्या या घटनेच्या निषेधार्थ नागपूर जिल्हा व शहर बसपाच्या वतीने उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी यांना निवेदन देण्यात आले.
25 ऑगस्ट 2023 रोजी अहमदनगर येथील श्रीरामपूर तालुका अंतर्गत येणाऱ्या हरेगाव या ठिकाणी कबूतर व शेळ्या चोरल्याच्या संशयावरून या खोट्या आरोपाखाली बौद्ध समाजाच्या शुभम माघाडे, कुणाल मगर, ओम गायकवाड व प्रणय खंडागळे या चारही अल्पवयीन तरुणांवर जातीवादी आरोपी युवराज गलांडे, मनोज बोडके, पप्पू पारवे, दीपक गायकवाड, दुर्गेश वैद्य, राजू बोरागे, या सहाही आरोपींनी मिळून त्या चौघांना सर्वप्रथम गलांडे यांच्या शेतीतील विहिरीवर नेले व झाडाला उलटे बांधून त्यांचे कपडे काढून नग्न केले. त्यांच्या तोंडावर लघुशका केली व गावांमध्ये नग्न करून त्यांची धिंड काढली. लाटाकाठ्यांनी त्यांच्या सूक्ष्म जागेवर मारहाण केली. त्यामधल्या एका आरोपींनी या सर्व घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केली होती. जेव्हा ही रेकॉर्डिंग सगळीकडे पसरली तेव्हा त्याच गावातील काही आंबेडकरी तरुणांना घटनेची माहिती मिळताच आणि धाव घेतली आणि त्यांची सुटका केली.या घटनेतील सहाही आरोपींना अनुसूचित जाती जमाती कायद्यानुसार कलम 307/367/364 नुसार गुन्हे नोंदवण्यात यावे व अॅट्रॉसिटीच्या कायद्यानुसार फास्ट ट्रॅक न्यायालयात आरोपींची लवकरात लवकर सुनावणी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी बहुजन समाज पार्टीतर्फे राष्ट्रपती द्रोपदी मुरूमु व गृहमंत्री अमित शहा भारत सरकार यांच्याकडे मागणी केली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात दलित, बौद्ध, आदिवासी समाजाला टार्गेट करण्यात येत आहे. सरकारने यावर लक्ष दिले नाही तर बहुजन समाज पार्टी तीव्र आंदोलन करणार असा इशारा यावेळी देण्यात आला.
यावेळी माजी जिल्हाध्यक्ष संदीप मेश्राम सुमंत गणवीर, उमेश मेश्राम, तपेस पाटील, विशाल बनसोड, धनराज हाडके, अजय गायकवाड, हेमंत बोरकर प्रा. करुणा मेश्राम, जगदीश गजभिये, विवेक सांगोळे, बुद्धम् राऊत, गुणवंत गिरटकर, प्रवीण पाटील, पराग रामटेके, राजरत्न कांबळे पारस खेडझरे यांच्यासह बसपाचे शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धा 3 डिसेंबरपासून

**नागपूर :** राज्यपाल कार्यालयाच्या पुढाकाराने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यंदाचे यजमानपद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लोनेरे भूषविणार आहे. नागपुरात 3 डिसेंबरपासून या क्रीडा महोत्सवाला प्रारंभ होणार असून नागपूर विद्यापीठ पाच क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणार आहे.
राज्यपालांचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेत काही दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत महिला गटातील नऊ क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे यजमानपद रातुम नागपूर विद्यापीठाकडे तर मुलांच्या गटातील स्पर्धांचे यजनमान डॉ. आंबेडकर टेक्नॉलॉजी विद्यापीठाकडे देण्यात आले होते. डॉ. आंबेडकर विद्यापीठाकडे संपूर्ण खेळांच्या मैदानांची तसेच बॅडमिंटन कोर्टची उपलब्धता नसल्याचे जाहीर केले. परिणामी मुलामुलींच्या गटात कबड्डी, खोखो, फुटबॉल आणि बुद्धिबळ या चार स्पर्धांचे आयोजन हे विद्यापीठ करणार आहे. तर रातुम नागपूर विद्यापीठ मुलामुलींच्या अॅथलेटिक्स, बास्केटबॉल, टेबलटेनिस, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन या पाच क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणार आहे.
नागपुरातील क्रीडा स्पर्धांचे आयोजन 3 ते 7 डिसेंबरदरम्यान करण्यात येणार आहे. तर 10 ते 14 डिसेंबरदरम्यान डॉ. आंबेडकर टेक्नॉ. विद्यापीठात उर्वरीत क्रीडा स्पर्धांचे आयोजन होणार आहे.
शताब्दी महोत्सवानिमित्त या स्पर्धा आयोजित करण्याचा मान नागपूर विद्यापीठाला तिसऱ्यांदा मिळाला आहे. याबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात आणि प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या नेतृत्वात या स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल अशी माहिती डॉ. शरद सूर्यवंशी यांनी दिली.
या क्रीडा महोत्सवात नागपूर विद्यापीठासह राज्यातील तब्बल 21 विद्यापीठाचे खेळाडू सहभागी होणार आहे. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉ. विद्यापीठ राजगड, डॉ. बालासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, डॉ. होमीभाभा राज्य विद्यापीठ मुंबई, गोंडवाना विद्यापीठा, गडचिरोली, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र ओपन विद्यापीठ, नाशिक व इतर विद्यापीठाचा समावेश आहे.

## रातुम नागपूर विद्यापीठाकडे पाच स्पर्धांचे यजमानपद



### नागपूर विद्यापीठाकडे तिसऱ्यांदा यजमानपद

रातुम नागपूर विद्यापीठ यंदा राज्य क्रीडा महोत्सवाचे यजमानपद भुषवित आहे. या स्पर्धांचे यजमानपद भुषविण्याचे नागपूर विद्यापीठाचे तिसरे वर्ष होय. पहिल्यांदा 1999 मध्ये नागपूर विद्यापीठाकडे या स्पर्धेची जबाबदारी मिळाली होती. यानंतर 2012 मध्ये नागपूर विद्यापीठाने दुसऱ्यांदा यजमानपद भुषविले, आणि 2023 मध्ये तिसऱ्यांदा या स्पर्धा आयोजनाचा मान नागपूर विद्यापीठाला मिळाला आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - ४४००१६ येथे मुद्रित केले व ९/२, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-४४००२७, येथे प्रकाशित केले.
RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016,
Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648